कृषीवल

रायगड, रविवार, दि. १५ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

## कोणाला स्थान, कोणाचा पत्त कट?

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या शपथविधीनंतर लांबलेला मंत्रिमंडळ विस्तार उद्या रविवारी (दि. १५) नागपूर येथे दुपारी ३ वाजता पार पडणार आहे. या मंत्रिमंडळात कोणाला स्थान मिळणार, कोणाचा पत्त कट होणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. चांगले मंत्रिपद पदरात पाडून घेण्यासाठी इच्छुकांनी जोरदार फिल्डिंग लावल्याची माहिती आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळ विस्ताराच्या कार्यक्रमाला वेग आला असून, मुंबईऐवजी आता नागपुरात पान २ वर

## दिल्ली चलो, शेतकऱ्यांचा निर्धार

**नवी दिल्ली :** शंभू सीमेवर शनिवारी (दि.१४) पुन्हा एकदा तणावाची स्थिती निर्माण झाली असून, शेतकरी दिल्लीला जाण्यासाठी ठाम आहेत. १०१ शेतकऱ्यांचा एक गट दिल्लीकडे कूच करणार आहे. दरम्यान, हरियाणा सरकारने शेतकऱ्यांचा मोर्चा सुरु होण्याच्या आधी अंबालामधील काही भागात इंटरनेट सेवा बंद करण्याचे आदेश दिले आहेत. शनिवारपासून १७ डिसेंबर मध्यरात्रीपर्यंत इंटरनेट बंद राहणार आहे. अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) सुमिता मिश्रा यांनी जारी केलेल्या आदेशानुसार हे आदेश १७ डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहेत.

# मिळकतखार : भरावाचा 'विक्रम'

### तहसीलदारांनी नेमलेल्या तपासणी पथकाला कारवाईचे अधिकारच नाहीत





**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

गेले दहा दिवस मिळकखार येथील अनधिकृत भराव प्रकरण चांगलेच गाजत आहे. 'कृषीवल' वृत्तपत्राने या प्रकरणात ग्रामस्थांची साथ देऊन अन्यायाला व प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराला वाचा फोडली. यानंतर तहसीलदार विक्रम पाटील यांनी यासंदर्भात ज्यांना अधिकारच नाही अशा अधिकाऱ्यांची तपासणी पथकात नेमणूक करुन ग्रामस्थांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे मिळकतखारमधील अवैध भरावप्रकरणी वाद चिघळला असून तहसीलदार विक्रम पाटील ग्रामस्थांच्या रडारवर आले आहेत.

तपासणी पथक नेमून प्रशासनाने केवळ कारवाई करीत असल्याचा दिखावा केल्याचा आरोप ग्रामस्थांतर्फे विनय कडवे व माजी उपसरपंच जगदीश म्हात्रे यांनी केला आहे.

शनिवारी पहाटेच्या सुमारास ठेकेदारांनी पुन्हा अंधाराचा फायदा घेत भरावाला सुरुवात केली. यावेळी तहसीलदारांनी नेमलेले तपासणी पथक व ग्रामस्थ उपस्थित होते. तपासणी पथकाने जेएसडब्ल्यूची स्लॅश गौणखनिज कायद्यामध्ये येत नसल्याने संबंधितांविरोधात कारवाई करता येत नसल्याचे सांगून हात वर केले. त्यावर ग्रामस्थ संतापले. कसले तुम्ही अधिकारी, जेएसडब्ल्यूची स्लॅश गौण खनिजामध्ये येत नसली तरी ती कांदळवनाच्या, खाडीच्या नैसर्गिकदृष्ट्या संवेदनशील विभागात येत असल्याने किमान पर्यावरण कायद्याखाली गुन्हे का दाखल करीत नाही, पान २ वर

### भरावाला प्रशासनाचे संरक्षण, स्थानिकांचे आत्मदहन?

**अलिबाग तालुक्यातील मिळकतखार येथे गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत भराव सुरु आहे. याबाबत अनेकदा तक्रारी करुनही निर्लज्ज प्रशासन टाळाटाळ करीत आहे. हा लढा गेली जवळपास दहा वर्षे सुरु आहे. अखेर शासन दरबारी चपला झिजवूनही न्याय मिळत नसल्याने अंधाराचा फायदा घेत रात्री भराव करणाऱ्या ट्रकसमोर झोपून मिळकतखारमधील ग्रामस्थ विनय कडवे यांनी शनिवारी (दि.१४) पहाटे दीड वाजता आत्मदहनाचा प्रयत्न केला. याप्रकरणी जिल्हा प्रशासन आर्थिक हितसंबंध जोपासत धनदांडग्यांना पाठिंबा देत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. वासवानी यांच्या जागेत प्रशासनाच्या संरक्षणातच भराव केला जात असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. दिवसा हे शक्य नसल्यामुळे भराव करणारे ठेकेदार रात्रीच्या सुमारास भराव करीत आहेत.**

### कृषीवल इफेक्ट

**कृषीवलने आवाज उठविल्यानंतर अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. तहसीलदार विक्रम पाटील यांनी तात्काळ गोविंद बुलचंद वासवानी यांना नोटीस बजावली आहे. यामध्ये तहसीलदार यांनी म्हटले की, जेएसडब्ल्यू कंपनीने २५० ब्रास टाकाऊ राखेचा भराव अनधिकृतपणे केल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत वृत्तपत्रात बातमी आली असून, भरावामुळे शेती नापिक होत आहे. तसेच नैसर्गिक नालेही धोक्यात आले आहेत. विनापरवाना व प्रमाणापेक्षा जास्त मालवाहतुकीमुळे अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वासवानींची असेल. याबाबत सात दिवसांत लेखी म्हणणे वासवानी यांनी समक्ष सादर करणे आवश्यक असून, तसे न केल्यास कारवाई करण्याचे आदेश तहसीलदार विक्रम पाटील यांनी दिले आहेत.**

## बंदूक साफ करताना सुटलेली गोळी थेट पायात

### महिला पोलीस जखमी

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस ठाण्यामधील महिला कर्मचारी बंदूक साफ करताना अचानक गोळी सुटल्याने जखमी झाली आहे. पोलीस ठाण्यामध्ये बंदूक साफ करत असताना पायाला गोळी लागल्याने नूतन लाड ह्या जखमी झाल्या. त्यांना उपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय, पेण येथे दाखल करण्यात आले आहे.



सविस्तर घटना अशी की, दादर सागरी पोलीस ठाण्यामधील महिला पोलीस कर्मचारी नूतन रामचंद्र लाड ह्या पोलीस ठाण्यामध्येच बंदूक साफ (सर्व्हिसिंग) करत असताना अचानक बंदुकीची गोळी सुटली. सदर गोळी ही नूतन लाड यांच्या पायाला घासून गेल्याने त्या जखमी झाल्या. त्यांना लगेच पेण येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, दादर सागरी प्रभारी अधिकारी नागेश कदम आदींनी तात्काळ भेट दिली.




## एसटी-मोटारसायकलचा अपघात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड हद्दीतील निसर्ग हॉटेलजवळच्या रस्त्यावरील शनिवारी (दि. १४) सकाळी ८.१० वाजता मोटारसायकल चालक व एसटी बसची समोरासमोर ठोकर लागून भीषण अपघात झाला. यामध्ये मोटारसायकल चालकाचा मृत्यू झाला. याबाबत एसटी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





सविस्तर असे आहे की, मुरुड एसटी बस डेपोतून रेवदंडा मार्गे महाडकरिता सकाळी ८ वाजता गाडी क्रमांक एम एच-२० बीएल ०३२८ ही एसटी चालक अविनाश मोहन दिघे (४१) व वाहक प्रशांत बुधनार हे एसटी घेऊन निघाले असता पाच मिनिटांवर निसर्ग हॉटेलसमोरील अरुंद वळणावरील रस्त्यावर मोटारसायकल चालक अरमान सलीम दखनी (१८) मुरुड अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेजमधील एफवाय बीएससीमध्ये पान २ वर

## अपघातात एक ठार

**महाड :** मुंबई-गोवा महामार्गावर शुक्रवारी सायंकाळी सात वाजता रस्त्याकडेला पंक्चर झालेल्या वाहनाचे टायर बदलत असतानाच महाडकडे येणाऱ्या भरधाव मोटारसायकलने चार जणांना धडक दिली. या अपघातामध्ये एक जण ठार, चार जण जखमी झाले आहेत. याबाबत दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई-गोवा पान २ वर

## महाठग पोलिसांच्या जाळ्यात

**नेरळ :** रत्नागिरी जिल्ह्यातील ३३ वर्षीय योगेश यशवंत हुमणे हा तरुण सुंदर मुलींना सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्याकडे आकर्षित करून जवळीक वाढवायचा. त्यातून लग्नाचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक करायचा. दरम्यान, महाठग अखेर नेरळ पोलिसांच्या हाती लागला आहे. आपल्या पहिल्या पत्नीला भेटायला आलेला योगेश हुमणे सध्या नेरळ पोलिसांच्या कोठडीमध्ये आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील बोपेले येथे राहणाऱ्या ३४ वर्षीय विवाहितेने आपल्या पतीविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार योगेश यशवंत हुमणे याच्याविरोधात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबतचा अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पान २ वर



# माथेरान पालिकेचा अजब कारभार

## एका मालमत्तेला एक, तर अन्य मालमत्तांना वेगळा न्याय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान शहर हे वनजमिनीवर वसले आहे. त्यामुळे वन विभागाचा अधिकार असलेल्या येथील जमिनीवर माथेरान नगरपरिषदेच्या मालमत्तादेखील आहेत. त्या मालमत्ता या विकण्यास बंदी आहे आणि त्यामुळे शहरात रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या एका मालमत्तेबाबत चक्क माथेरान नगरपरिषदेने ही मालमता विकत घेऊ नये, असे आवाहन करण्यात येणारे फलक लावले आहेत. दरम्यान, माथेरान शहरात कपाडिया मार्केटमधील मालमत्तांचे विक्री व्यवहार झाले असून, त्याबाबत दोन-तीन वर्षांत पालिकेने असे कोणतेही फलक लावले नसल्याने माथेरान नगरपरिषदेच्या या तत्परतेबद्दल उलटसुलट चर्चा सुरु आहे.**



माथेरान शहरामधील कपाडिया मार्केट हे दान देण्यात आलेली मालमता आहे. दान करण्यात आलेल्या मालमत्तेमधील कोणताही गाळा हा कायमस्वरूपी भाडेतत्त्वावर देण्याचे धोरण होते. मात्र, कपाडिया मार्केटमधील काही मालमत्तांची विक्री झाली असल्याची चर्चा माथेरानमध्ये आहे. त्यावेळी माथेरान पालिकेकडून किंवा आतापर्यंत कपाडिया मार्केटमधील गाळ्यांची विक्री होणार नाही की विक्री करू नये किंवा कोणालाही विक्री करू नये अशा प्रकारचे कोणतेही फलक माथेरान पालिकेने अद्याप लावले नाहीत. मात्र, याच माथेरान पालिकेने शहरातील स्टेशनसमोर असलेल्या जागेबाबत सदर जागा माथेरान पालिकेची असून, त्या जागेची खरेदी कोणी करू नये, असे फलक लावले आहेत. त्यामुळे माथेरान शहरातील भूखंड क्रमांक १६५ हि जमीन पालिकेची असल्याने कोणी खरेदी करू नये, असे फलक लावल्याने शहरात एकच चर्चा सुरु झाली आहे.

शहरातील कपाडिया मार्केटमधील तसेच माथेरान स्टेशन समोरील बोहरी धर्मशाळा अशा जागांबाबत माथेरान पालिका क्रियाशील नसल्याचे यापूर्वी दिसून आले आहे. पण शहरातील भूखंड क्रमांक १६५ बद्दल दाखवलेली तत्परता याबद्दल शहरात उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत.माथेरान पालिका वेगवगेळ्या भूखंडांबाबत वेगेवेगळी भूमिका घेताना दिसत असल्याने पालिकेच्या या भूमिकेबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.माथेरान पालिकेने लावलेला फलक हा ज्या १६५ भूखंड याला लावला आहे,त्या भूखंडापासून अवघ्या २० मीटर अंतर पुढे असलेली बोहरी धर्मशाळा हि मालमत्ता कोणाची होती याचा शोध पालिका मुख्याधिकारी घेणार आहेत काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# नरेंद्र महाराज संप्रदायातर्फे माधुकरी अभियान

**। कोर्लइ । वार्ताहर ।**

जगदगुरु श्रीस्वामी नरेंद्र महाराज संप्रदायातर्फे मुरुड तालुक्यातील मजगांव, आदाड, उसरोली व वालवटी येथे शनिवारपासून माधुकरी अभियानास प्रारंभ करण्यात आला.

या अभियानांतर्गत १० सेवा केंद्रांमध्ये ५० गावांत माधुकरी अभियान राबविण्यात येत असून, ५ टन तांदूळ जमा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या माधुकरी अभियानातून जमा झालेल्या धान्यातून नाणीज येथील संस्थानात गोरगरीबांना तसेच भक्तगणांना दररोज महाप्रसाद दिला जातो. ज्या ज्या भाविकांनी या अभियानास प्रतिसाद देऊन सहकार्याचा हात पुढे केला, त्या भाविकांचे श्री नरेंद्र महाराज संप्रदायातर्फे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

कार्यक्रमाचे औचित्य साधून यावेळी संतसंगातील दहा सेवा केंद्रांतील अध्यक्ष, महिला अध्यक्ष व भक्त गणांचा यथोचित सन्मान करण्यात येत आहे.

श्री संप्रदायाचे मुरुड तालुका अध्यक्ष अंकुश वाडकर, सचिव जितेंद्र पाटील, कमांडर, जिल्हा महिला अध्यक्षा अंजली जगताप, तालुका महिला अध्यक्षा प्राची पाटील, महेश मोठेबुवा, संतोष चोरघे, सुधीर पुळेकर, भजनी बुवा मधुकर कुद्रुसे, अनंता भगत यांसह भक्तगण व महिला वर्ग मोठ्या संख्येने अभियात सहभागी झाला होता.

# मारहाण करून लुटले

**। पनवेल । वार्ताहर ।**

चार अनोळखी इसमांनी लिफ्ट मागण्याचा बहाणा करून मोटारसायकल थांबवली आणि मारहाण करून मोटारसायकल, मोबाईल, रोख रक्कम आणि घड्याळ घेऊन ते पळून गेले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात चार अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

केशव सोनवणे हे करंजाडे गाव सेक्टर ४ येथे राहात असून, ७ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास ते जुई गाव येथे गेले होते. रात्री जेवण करून आठ डिसेंबर रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास मोटारसायकलने घरी जाण्यासाठी निघाले. रात्री एकच्या सुमारास करंजाडे गावाकडील बाजूला पार्किंगजवळ खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ ते गेले. ते मोटारसायकलवरून घरी जात असताना चार अनोळखी इसमांनी थांबून लिफ्ट मागितली आणि हॉटेलला सोडण्यास सांगितले. त्यावेळी त्यांना नकार दिल्याने त्यातील दोन इसमांनी त्यांना गाडीवरून खेचले व मारहाण करून हातातील घड्याळ, खिशातील मोबाईल आणि रोख रक्कम नऊ हजार रुपये खिशातून काढून घेतले व त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून बाजूला ढकलले. त्यानंतर ते सोनवणे यांच्या मोटारसायकलवर बसून तेथून पळून गेले.

# मोफत नेत्रचिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। हमरापूर । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील हमरापुर येथे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल व हमरापूर गाव विकास मित्र मंडळ हमरापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते.



यावेळी शिबिराचे आयोजक माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, विद्यमान सरपंच राकेश दाभाडे, दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागेश कदम, माजी सरपंच ओंकार पाटील, संजय पाटील, रवींद्र शेदवळ, अतुल भगत, सुभाष दाभाडे, महेंद्र पाटील, विनोद नाईक, राजू भगत, संजय नाईक, सतीश पाटील, चंद्रकांत भगत, शंकर भगत, सचिन गोलिमडे, संदेश कदम, सचिन फके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

या शिबिरात नंबर तपासणी तसेच डोळ्यांच्या इतर आजारांची तपासणी करण्यात आली. तसेच ज्यांना मोतीबिंदू आहे त्यांना पनवेल येथील रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले आहे. शिबिरात जवळपास सव्वाशेहून अधिक लोकांची तपासणी करण्यात आली.

# अरुणा शहासने यांचे निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे बाजारपेठेतील रहिवासी आणि काळण समाज महिला मंडळांच्या प्रमुख आधारस्तंभ अरुणा दिलीप शहासने (६७) यांचे बुधवार, दि. ११ डिसेंबर रोजी पहाटे राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. बाजारपेठ मधील एम.के. शहासने किराणा माल दुकानाचे प्रसिद्ध व्यापारी व काळण समाज नेते दिलीप शहासने यांच्या त्या पत्नी आणि विजय महाराज शहासने यांच्या वहिनी होत.



दिवंगत अरुणा शहासने यांच्या पार्थिवावर येथील अंबा घाटावरील वैकुंठ स्मशानभूमीत बुधवारीच सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी शहासने यांचे सागे-सोयरे, नातेवाईक, आप्तेष्ट, शहासने यांचा मित्रपरिवार, नागोठणे विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. कै. अरुणा शहासने यांच्या पश्चात पती, एक विवाहित मुलगा, एक विवाहित मुलगी, सून, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. कै. अरुणा शहासने यांचे दशक्रिया विधी शुक्रवार, दि. २० डिसेंबर रोजी उद्धर (पाली) व उत्तरकार्य सोमवार, दि. २३ डिसेंबर रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती शहासने कुटुंबियांकडून देण्यात आली.

# स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी कठोर परिश्रम करा

## ■ माजी मुख्याध्यापक उदय गद्रेंचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जीवनात यश मिळवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अथक परिश्रमाने अभ्यास करून यश प्राप्त करावे व गुणवत्तेची कास धरावी जेणेकरून जीवनात आपल्याला उचित ध्येय गाठता येते. शालेय जीवनात अभ्यासाकडे सर्वाधिक लक्ष देणे गरजेचे आहे. स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी कठोर परिश्रम करा, असे माजी मुख्याध्यापक उदय गद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस ए हायस्कूल व स्व. म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमावेळी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, अपयश आले तरी घाबरून जाऊ नका. नोकरी मिळाली नाही तरी शिक्षणाच्या माध्यमातून मेहनतीचे व्यवसाय करा. एक दिवस सन्मानाने मी शाळेत प्रमुख अतिथी म्हणून येईन असे स्वप्न बाळगा. स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी कठोर परिश्रम करा, असे आवाहन गद्रे यांनी केले.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, संस्थेच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, सचिव चंद्रकांत अपराध, संचालक प्रमोद भायदे, पांडुरंग आरेकर, स्नेहा गद्रे, उदय दांडेकर, अभय दिवेकर, उत्कर्षा गुंजाळ, सुनील गावडे, मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, कार्याध्यक्ष महेंद्र पाटील, शिवाजी घुगे, महेंद्र घाटवळ, राहुल वर्तक, दिपाली रोटकर, उल्हास गुंजाळ, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी मंथन दिवेकर, रागिणी पावशे तसेच पालकवर्ग, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली रोटकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेंद्र घाटवळ यांनी केले.

# आवरे शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन

**। उरण । वार्ताहर ।**

ग्लोबीकॉन कंपनी यांनी उरण तालुक्यातील आवरे येथील जिल्हा परिषद शाळेस १० लॅपटॉप भेट दिले. त्या प्रित्यर्थ संगणक कक्ष उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी कंपनी हेड शकील इनामदार, मनिष म्हात्रे, प्रज्वल सकपाळ यांनी संगणक कक्षाचे उद्घाटन केले.यावेळी व्यवस्थापन समिती सदस्य डी.ए .गावंड, प्रवीण भगत, सुभाष गावंड, संदिप गावंड,



खोपटे शाळेचे मुख्याध्यापक गोंधळी सर व महिला सदस्य उपस्थित होत्या. यावेळी समाधान गावंड यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रार्थना पुस्तकाचे वाटप केले. सूत्रसंचालन बबन पाटील यांनी केले. यावेळी अध्यक्ष शंकर पाटील, अरूणा तिरमाळी, गणेश गावंड, पुजा चव्हाण,म्हतू आहेर, रूपाली चव्हाण, रचना गावंड यांचे सहकार्य लाभले. निर्भय म्हात्रे यांनी आभार मानले.

पान १ वरून

## कोणाला स्थान, कोणाचा पत्ता कट?

मंत्रिमंडळ विस्तार करण्यात येणार असल्याचं निश्चित झालं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे २१ मंत्री शपथ घेणार आहेत, तर राष्ट्रवादीचे १० आणि शिवसेनेच्या १२ मंत्र्यांचा शपथविधी होईल. त्यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपदाचा देखील समावेश आहे. विशेष म्हणजे नागपुरात पहिल्यांदाच मंत्र्यांचा शपथविधी होत आहे.

## मिळकतखार : भरावाचा ‘विक्रम’

असा सवाल उपस्थित केला. मात्र तपासणी पथकातील अधिकाऱ्यांना त्यांना कारवाई करता येणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे ग्रामस्थांना भराव रोखण्यासाठी सकाळपर्यंत पहारा द्यावा लागला. यावरुन तहसिलदार विक्रम पाटील यांनी ग्रामस्थांची निव्वळ थट्टा केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे.

## अपघातात एक ठार

महामार्गावर केंबुर्ली गावच्या जवळ एमएच ०८ एपी ३३५२ या टेम्पोचा टायर पंक्चर झाल्याने टायर बदलण्याचे काम सुरू होते. त्याच दरम्यान महाड दिशेने येणारी एमएच ०६ बीजे ४५३४ ही मोटारसायकल भरधाव वेगात टायर बदलणाऱ्या चौघांवर आदळली. या अपघातामध्ये यशवंत हरिश्चंद्र महाप्रळकर (६५) यांना उपचारासाठी नेत असतानाच मयत झाले. तर, टेम्पोचा टायर बदलणारे फिराश उमर मुगरूसकर, रा. म्हाप्रळ, शिवम शिवदास साळी, रा. म्हाप्रळ बौद्धवाडी, आकीब अब्दुल मजीद मुगरूसकर, रा. म्हाप्रळ, तर आरोपी सूरज चंद्रकांत सावंत हे चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता केंबुर्ली या ठिकाणी झाला. याबाबत दुचाकीस्वार सूरज चंद्रकांत सावंत, रा. खैरे महाड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एसटी-मोटारसायकलचा अपघात

शिकणारा विद्यार्थी, रा. मुरुड नादगाव मोहल्ला जात होता. तो आपल्या वडिलांची मोटारसायकल क्रमांक एमएच ०६ सी जे ००१७ बजाज कंपनीची केटीएम १२५ डक गाडी घेऊन निसर्ग हॉटेलच्या रस्त्यावरून वळणावर येत असताना भरधाव एसटी आणि मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात मोटारसायकल चालकाच्या डोक्याला मोठा मार लागल्याने रक्तस्राव होऊ लागला. त्याला तात्काळ मुरुड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले; परंतु वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम यांनी त्याला मृत घोषत केले.

या अपघाताची माहिती मिळताच मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी व ग्रामीण रुग्णालयात येऊन या अपघाताची चौकशी केली.असता यावेळी एसटी चालक अविनाश दिघे यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख करीत आहेत.

## महाठग पोलिसांच्या जाळ्यात

महिला पोलीस उपनिरीक्षक प्राची पांगे करीत होत्या. बोपेले येथील तक्रारीदार महिलेने पतीच्या विरोधात मानसिक छळवणूक आणि आर्थिक फसवणूक तसेच पतीचे याआधी लग्न झाले असताना माझी फसवणूक करून माझ्यासोबत दुसरे लग्न केल्याचे नमूद केले होते. त्याने अनेक महिलांना लग्नाचे आमिष दाखवून १५ ते २० लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले आहे. योगेशने अविवाहित असल्याचे भासवून पीडितांना लुटले आहे. दोन मुलींशी लग्न करून तिसऱ्या मुलीसोबत लग्न करण्याची तयारी त्याने सुरू केली होती. मात्र, त्याआधी नेरळ पोलिसांच्या जाळ्यात तो सापडला आहे.

३३ वर्षीय योगेश हा मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातील तालुका खेडजवळील जामगे येथील राहणारा आहे. महिलांची फसवणूक करण्यात पटाईत असलेल्या योगेशने आजवर अनेक सुंदर मुलींची फसवणूक केलेली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख निर्माण करून त्या महिलेला किंवा मुलीला लग्नाचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केलेली होती. त्यात एक महिला पोलीस कर्मचारी असल्याचेदेखील बोलले जात आहे. याबाबत तक्रारदार महिलेच्या माहितीनुसार, योगेशला अटक करण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला होता. योगेशने कार खरेदी केली होती. मात्र, ती कार पत्नीच्या नावे होती. त्यामुळे आपल्या नावावर कार करायची असल्याने पत्नीला भेटायला बोपेले येथे आलेल्या योगेशच्या नेरळ पोलिसांनी मुसक्या आवळल्या.

# विकास घरत यांची क्षयरोगग्रस्तांना मदत



**। पनवेल । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा क्षयरोग विभागामार्फत आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसीय टीबी मुक्त अभियान संपूर्ण रायगड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या अभियानात सामाजिक दायित्वच्या भावनेतून माजी नगरसेवक विकास घरत यांनी क्षयरोग निदान झालेल्या कामोठेमधील पाच व्यक्तींना पोषणासाठी सहाय्य दिले.

या अभियानात अतिजोखमीच्या व्यक्तींची नॅट आणि एक्स रेच्या मदतीने क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. तसेच क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींवर त्वरित तसेच योग्य उपचार करण्यात येत असून, क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींना पोषणासाठी निक्षय पोषण योजनेचा लाभ तसेच निक्षय मित्र बनवून पोषणासाठी सहाय्य देण्यात येत आहे. त्यापार्श्वभूमीवर या अभियानात सामाजिक दायित्वच्या भावनेतून माजी नगरसेवक विकास घरत यांनी क्षयरोग निदान झालेल्या कामोठेमधील पाच व्यक्तींना पोषणासाठी सहाय्य दिले. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



# आराधना महोत्सव उत्साहात

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील अमृतधारा गोशाळा धगडवाडी येथे गोकर्ण मंडलाधीश्वर श्रीमत जगद्गुरु शंकराचार्य राघवेश्वर भारती, महास्वामीजी रामचंद्रपूर मठ होसनगर यांच्या प्रमुख उपस्थितीत आराधना महोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी चारी वेदांचा अभ्यास असणारे पंडित तसेच ३०० पेक्षा जास्त शिष्यगण उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा भट, प्रकाश भट परिवार मुंबई डोंबिवलीचे सर्व सदस्यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. धगडवाडी गो शाळेचे राघवेश्वर भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य सुरु आहे.



# विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

**। खांब । वार्ताहर ।**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे, ता. रोहा येथे मोफत आरोग्य तपासणी कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

रोह्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीतील नामांकित दीपक नायट्रेट कंपनी यांच्या दीपक फाऊंडेशन रोहा यांच्या वतीने सदरील आरोग्य तपासणी कार्यक्रम संपन्न करण्यात आला. या मोफत आरोग्य तपासणीत विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन व शारीरिक तपासणी करून तंदुरुस्तीसाठी आवश्यक सूचना देऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, दिपक फाऊंडेशन रोहाचे डॉ.प्रियंका धनावडे, परिचारिका अश्विनी म्हसकर, उत्कर्षा म्हस्के, डाटा एंट्री ऑपरेटर सेजल घोरपडे आदी उपस्थित होते.

# रिलायन्सविरोधात आता आरपारची लढाई

## ■ नरेंद्र गायकवाडांचा तीव्र जनआंदोलनाचा इशारा

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनीच्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीतह नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. अशातच रिलायन्स नागोठणे कंपनीच्या बेणसे सिद्धार्थ नगरलगत सुरू असलेल्या कामकाजाविरोधात बेणसे सिद्धार्थ नगर व विभागातील ग्रामस्थ शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत.

आपली शेतजमीन वाचविण्यासाठी योगेश अडसुळे व अन्य शेतकऱ्यांनी आंदोलनात्मक लढ्याची भूमिका घेतली आहे. रिलायन्स नागोठणे कंपनीच्या विरोधात शेतकरी योगेश अडसुळे यांनी बुधवारी दि.(११) पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. बेणसे सिद्धार्थ नगर येथे होत असलेल्या या आंदोलनाला शेतकरी, भूमीपुत्र, प्रकल्पग्रस्त, समाज बांधव आणि सामाजिक व राजकीय नेते मंडळी, तसेच ग्रामस्थांचा दिवसेंदिवस मोठा मिळत आहे. शुक्रवारी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी योगेश अडसुळे व आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी व पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्याच्या दृष्टीने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी गायकवाड यांनी शेतकरी व स्थानिक जनतेचे प्रश्न समस्या जाणून घेतल्या. रिलायन्स करीत असलेल्या कामाची पाहणी केली. त्यानंतर माध्यमांना आपली भूमिका मांडताना रिपाइं पक्ष आंदोलकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भूमीपुत्रांच्या न्याय्य हक्कासाठी रिलायन्स नागोठणेविरोधात उग्र जनआंदोलन छेडणार असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांना दिला. तसेच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पेण तहसीलदार गुंजाळ यांना संपर्क करून उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर प्रशासन स्तरावर सकारात्मक भूमिका घेण्याबाबत आवाहन केले. यावेळी रिपाइं जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, कोकण प्रदेश संघटक रवींद्रनाथ ओव्हाळ, रायगड जिल्हा युवक सचिव ॲड. सुशील गायकवाड, रोहा तालुकाध्यक्ष संतोष गायकवाड, खालापूर तालुका अध्यक्ष सूर्यकांत कांबळे, सुधागड तालुका युवक अध्यक्ष निशांत पवार, रायगड जिल्हा युवक संघटक अक्षय गायकवाड, ॲड. प्रकाश कांबळे, पाली युवक शहर अध्यक्ष दिनेश गायकवाड, जगदीश वाघमारे, सुदीन शिर्के आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडक

## अंमली साठा उद्ध्वस्त

**पनवेल :** कळंबोली परिसरात काही व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीचा आधार घेत अंमली पदार्थ विरोधी पथकाने कळंबोली परिसरात सुरु असलेले अंमली पदार्थाचे रॅकेट उद्ध्वस्त करुन या रॅकेट मधील दोघांना अटक केली आहे. तसेच, त्यांच्याकडून हेरॉईन तसेच कॅफेन सिरफच्या बाटल्या आणि रोख रक्कम असा सुमारे ६.९० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## कैद्याचा हृदयविकारामुळे मृत्यू

**पनवेल :** तळोजा कारागृहातील अर्जुन केरू अभंग (५०) या कैद्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अर्जुन अभंग या कैद्याच्या छातीत दुखत असल्याने त्याला वाशी मधील नवी मुंबई महापालिका सार्वजनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. अर्जुन अभंग याचा हृदय विकारामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. वाशी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाही सुरु केली आहे.

## रस्त्यावर-फुटपाथवर अतिक्रमणे

**पनवेल :** महापालिका कार्यक्षेत्रातील चार प्रभागातील रस्त्यावर तसेच फुटपाथवर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, 'ड' प्रभाग अतिक्रमण विरोधी पथकाडून रेल्वे स्थानक परिसरात कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे येथील नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ मिळत नसल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरुन चालावे लागत आहे.

## कोंबडी न दिल्याने मारहाण

**पनवेल :** मोहम्मद शहीद हमीद खान या चिकन विक्रेत्याने बलाल गुलाम पटेल उर्फ बिलाल पसारा याला उधारीवर कोंबडी न दिल्याने त्या रागातून त्याने शिवीगाळ करून हाताबुक्क्याने मारहाण केली आहे. तसेच, खान यांचा मुलगा शहेनशहा याच्या हातावर चाकूने वार करून त्याला जखमी केले आणि तेथून बिलालने पळ काढला. याप्रकरणी बिलाल पटेल याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सोन्याची बांगडीची चोरी

**पनवेल :** एसटी प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाच्या हातातील ५५ हजार रुपये किंमतीची सोन्याची २७ ग्रॅम वजनाची बांगडी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना पनवेल एसटी आगारात घडली आहे. शुभांगी पाटील (६९) या पनवेल एस.टी.डेपोमध्ये पनवेल ते अलिबाग जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना कुणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या हातामधील २७ ग्रॅम वजनाची सोन्याची बांगडी चोरुन नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### सीसीटीएनएस कार्यप्रणालीत

# रायगड पोलीस अव्वल

### राज्यातून तिसऱ्या क्रमांकाचे यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गुन्हेगारांची कुंडली जुळविण्यात सीसीटीएनएस कार्यप्रणाली प्रभावी ठरत आहे. या कार्यप्रणालीचा वापर करीत वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल केली आहे. वार्षिक गुणांकनामध्ये रायगड पोलीसांनी राज्यातून तिसरा क्रमांक मिळविण्यास यश संपादन केले आहे. पोलिस महासंचालक रश्मी शुल्का यांच्या हस्ते वार्षिक गुणांकनाचे पारितोषिक देण्यात आले. पुणे येथील रामटेकडी येथे झालेल्या १८ व्या महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळाव्यात हा सोहळा पार पडला.



आधुनिकेतचा वापर करीत रायगड पोलिसांकडून वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. सीसीटीएनस म्हणजे क्राईम ॲन्ड क्रिमिनल ट्रॅकींग नेटवर्क्स ॲन्ड सिस्टीम हा भारत सरकारच्या अंतर्गत येणारी ऑनलाईन ट्रॅकींग प्रणाली आहे. मुंबईमधील २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यानंतर ही संकल्पना मांडण्यात आली. या प्रणालीद्वारे सर्व पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांची नोंदणी, तपास, आरोपपत्राशी संबंधित माहिती डिजीटल करणे, गुन्हेगारी आणि गुन्हेगारांची माहिती घेणे, अशा अनेक प्रकारच्या गुन्ह्यांचा शोध लावण्यास उपयोगी ठरत आहे. रायगड पोलिसांनी या प्रणालीद्वारे पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यांवर तात्काळ अहवालांची नोंदणी करण्यावर भर दिला. या प्रणालीद्वारे गुन्ह्यांवर अंकूश ठेवण्याचा प्रयत्न कायमच केला आहे. रायगड पोलिसांनी गुणांकनात राज्यात तिसरा क्रमांक मिळवून पुन्हा एकदा आपली सरशी सिध्द केली आहे. यापुर्वीदेखील सीसीटीएनएस कार्यप्रणालीच्या वार्षिक गुणांकनात यश संपादन केले आहे.

> रायगड पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या अपारमेहनतीमुळे सीसीटीएनएस कार्यप्रणालीत पुन्हा यश मिळवता आले आहे. या यशाचे सातत्य कायम ठेवत यापुढेही रायगड जिल्हा अग्रस्थानी ठेवण्याकरीता प्रयत्नशिल राहील.
>
> – सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड

पोलीस ठाण्यात अटक होणाऱ्या गुन्हेगारांची कुंडली जुळविण्यात सीसीटीएनएस ही प्रणाली अत्यंत प्रभावी ठरत आहे. रायगड जिल्हा पोलीस दलाची ही घोडदौड यापुढेही अशीच सुरू राहील, असे मत अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी व्यक्त केले आहे.

## नवी मुंबईत करोडोंचे ड्रग्ज जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरासह नवी मुंबईत थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर २५ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. या कारवायांमध्ये १२ कोटींचे ड्रग्ज पोलिसांच्या हाती लागले असून याप्रकरणी १६ नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबईत ड्रग्ज विक्रेत्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. गतवर्षी खारघर येथे नायजेरियन व्यक्तींच्या अड्ड्यावर छापा टाकून थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांमध्ये पुरवले जाणारे ड्रग्ज जप्त केले होते. त्यानुसार यंदाही थर्टी फर्स्टच्या अगोदरच पोलिसांनी ड्रग्ज विक्रेत्या टोळ्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची मोहीम राबवली आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकामार्फत ड्रग्ज विक्रीत सक्रिय असलेल्या नायजेरियन टोळ्यांची माहिती मिळवली होती. त्याद्वारे गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांच्या पथकांनी एकाच वेळी परिमंडळ एक व दोनमधील विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले.

यात ८ नायजेरियन व्यक्तींकडे एकूण १२ कोटींचे विविध प्रकारचे ड्रग्स मिळून आले, तर ८ नायजेरियन व्यक्ती बनावट कागदपत्रांद्वारे भारतात वास्तव्य करत असल्याचे समोर आले आहे. या एकूणच कारवाईत १६ नायजेरियन नागरिकांना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच, या कारवाई दरम्यान पासपोर्ट व व्हिसा संपलेल्या ७३ ऑफ्रिकन नागरिकांना देश सोडून जाणेबाबतच्या नोटीसा अदा करण्यात आल्या आहेत.

## मुंबई-गोवा महामार्गावर धुळीचे साम्राज्य

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. परंतु, या चौपदरीकरणासाठी वापरण्यात येणारी माती, सिमेंट, खडी रस्त्यावर पडत असल्यामुळे या महामार्गावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. खांब, पुई, कोलाड बाजारपेठ ते तळवली रातवड या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु असल्यामुळे येथे प्रचंड धूळ पसरत आहे. या धुळीमुळे वाहनचालकांसह प्रवासीवर्ग व रहिवाशी नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.



मुंबई-गोवा महामार्गावर धुळीचा त्रास होऊ नये म्हणून रस्त्याला पाण्याची फवारणी केली जात आहे. परंतु, या फवारणीमुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होत आहे. या चिखलातून मार्ग काढताना दुचाकी वाहने घसरून अपघात घडत आहेत. यामुळे असंख्य प्रवाशी जखमी होत आहेत. तर, अनेकांचा नाहक बळी जात आहे. यामुळे याला जबादार कोण, असा प्रश्न प्रवाशी वर्गातून केला जात आहे. कोलाड बाजारपेठेत तसेच तळवली, पुई, खांब येथील महामार्गवरील रस्त्यावर प्रचंड धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या धुळीमुळे वाहचालकांसहित, प्रवासी वर्ग, व्यापारी तसेच रहिवाशी नागरिक बेजार झाले आहेत. वेगाने ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावरील धूळ व्यावसायिकांच्या दुकानात जाऊन मोठे नुकसान होत आहे. याला पर्याय म्हणून रस्त्यावर पाणी मारले जात आहे. परंतु, या पाण्यामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होत आहे. तर, दोन तासांनी परिस्थिती जैसे थे अशीच होते. यामुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे.

## ग्रंथ प्रदर्शनांच्या माध्यमांतून अध्यात्मप्रसार

**। रायगड । वार्ताहर ।**

सनातन संस्थेच्यावतीने दत्त जयंतीच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यात एकूण २३ ठिकाणी विविध दत्त मंदिरांजवळ ग्रंथप्रदर्शने लावून अध्यात्मप्रसार करण्यात आला. या ग्रंथ कक्षांच्या माध्यमांतून अध्यात्म आणि साधनेविषयी अलौकिक ज्ञान असलेले सनातनचे ग्रंथ भाविक आणि जिज्ञासू यांच्यासाठी उपलब्ध करण्यात आले. या सर्व ग्रंथप्रदर्शनांना भेट देणारे भाविक आणि जिज्ञासूंचा उत्तम प्रतिसाद लाभला.



दत्तगुरूंच्या उपासनेविषयीच्या ग्रंथांसह सनातन संस्थेच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेली अध्यात्म, साधना, देवतांची उपासना, आचारधर्म, धर्माचरण, बालसंस्कार, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती, आपत्काळविषयीची सिद्धता, आयुर्वेद, आरोग्य आदी विषयांवरील ग्रंथमालिकेतील ग्रंथ तसेच सात्त्विक उत्पादनांचे येथे वितरण करण्यात आले. सनातनच्या अनेक ग्रंथपदर्शनांवर यावेळी अनेक जिज्ञासूंनी साधना, वास्तूशुद्धी आदी विषयांवर शंकानिरसनही करुन घेतले, तसेच दैनंदिन जीवनात धर्माचरण आणि साधनेसाठी करावयाच्या कृती सुद्धा काही जिज्ञासूंनी समजून घेतल्या.

## बोर्लीच्या उमेरचा प्रामाणिकपणा



**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहरात वांजळे रस्त्यात प्रवासादरम्यान हरवलेल लाखो रुपयाचे सोन्याचे ब्रेसलेट प्रामाणिकपणे परत देण्याची घटना शुक्रवारी (दि.१३) घडली आहे.

बोर्लीपंचतन येथील नितेश मुद्राळे यांचे वांजळे या रस्त्यावर त्यांच्या हातातील १ लाख २५ हजार किंमतीचे सोन्याच ब्रेसलेट हातातून निसटून पडले होते. त्यानंतर याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून ब्रेसलेट मालक मुद्राळे यांच्याकडून वस्तू हरवलेली असून कोणाला मिळाली असल्यास परत करावी, असे आवाहन करण्यात आले होते. दरम्यान, उमेर जंजिरकर याला ब्रेसलेट मिळाल्यानंतर सोने दुकानदार किरण तळकर यांच्याशी संपर्क करून ही वस्तू ज्याची असेल त्याला मिळावी यासाठी विनंती केली. यावेळी सोशल मीडियावरील पोस्ट पाहून मुद्राळे यांना संपर्क साधून ब्रेसलेट त्यांना सुपूर्द करण्यात आले.

### अठराव्या शतकात पादुकांची प्रतिष्ठापना

# श्रीदत्त मंदिरात यात्रोत्सवाला प्रारंभ

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**


स्वामी ब्रम्हेंद्र धावडशीकर यांनी अठराव्या शतकात मुरूड-जंजिरा येथील उंच टेकडीच्या माथ्यावरील सपाट मैदानातील उंबराच्या झाडाजवळ श्री दत्त गुरुंच्या पादुकांची प्रतिष्ठापना केली होती. तद्नंतर १९२६-२७च्या सुमारास मंदीराचे कळस व सभागृहासह मंदीराचे बांधकाम करण्यात आले. इ. स.१९२७मध्ये पहिली जत्रा इथे भरविण्यात आली १९९७ साली मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला आला. इ.स.१९२७ मध्ये पहिली जत्रा येथे भरविण्यात आली होती. श्री दत्त मंदीर उंच डोंगरावर असुन ३०९ पायऱ्या चढुन जावे लागते. समुद्रसपाटी पासुन सुमारे ३५० मीटर उंचावर हे ठिकाण आहे. दत्तजयंती निमित्त शनिवार (दि.१४) श्रीदत्तमंदिर येथे श्री दत्तजयंती यात्रा उत्सव सुरु झाला असून सायंकाळी ५ वा. दत्तात्रेय उपाध्ये बुवा यांचे सुश्राव्य कीर्तन व जन्मोत्सव सोहळा मोठ्या भक्ती भावाने पार पडला. तसेच, महेश सुर्वे व श्री काळभैरव प्रासादिक भजन मंडळ भंडारवाडा-मुरुड यांचे सुश्राव्य भजनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.



## श्रीदत्त मुखवटा पालखी उत्साहात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त जयंती परंपरेने उत्साहात साजरी केली जाते. यानिमित्ती चौल पाठारे क्षत्रीय पाचकळशी माळी समाजाच्यावतीने श्री दत्त मुखवटा पालखी सोहळा संपन्न झाला. गेली शंभर वर्षाच्या परंपरेने चौल भोवाळे श्री दत्त जयंतीच्या दिवशी सकाळी श्री दत्त मुखवटा पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावेळी या मुखवटा पालखी सोहळ्याला चौल पाचकळशी माळी समाज बांधव मोठया संख्येने सामील झाले होते. परंपरेनुसार थेरोंडा पानसेवाडी दत्तात्रेय नाईक यांच्या घरातुन दत्त मुखवटा पालखीत बसवुन सकाळी ७ वाजता वाजत गाजत भक्तीभावाने श्री दत्त मदिंराकडे प्रस्थान करतात. यावेळी सुरेश घरत, रमेश म्हात्रे, प्रविण राऊत, अनंत घरत, वामन घरत, प्रपुल्ल मोरे, बलराम नाईक, मधुसुदन नाईक, नरेश म्हात्रे, सचिन कोटकर, विनोद कोटकर, सुभाष कोटकर, राकेश बेडेकर, बलराम म्हात्रे, अशोक घरत, उदय नाईक, संजय काबाळे, संजय नाईक व महिला उपस्थीत होत्या.



## उरणची प्रसिद्ध दत्त यात्रा



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरणमधील चिरनेर व देऊळवाडी येथे शनिवारी (दि.१४) श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त मंदिरात श्री दत्तगुरूंची महापूजा व महाअभिषेक व महाआरती करण्यात आली. सकाळपासून उरण शहरासह ग्रामीण भागातील दत्तभक्तांनी मोठी गर्दी केली होती. पालखी दत्त मंदिर येथून विमला तलाव गणपती चौक, राम मंदिर पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. तसेच, उरण शहरातील प्रसिद्ध यात्रेनिमित्त खेळणी, शोभेच्या वस्तू, मिठाईची व आकर्षक शोभेच्या वस्तूंची दुकाने थाटण्यात आली होती.

तर, उरण तालुक्यातील केगाव हद्दीतील विनायक येथील जगदीश कोळी व कुटुंबियांचे एक मुखी दत्त मंदिरात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बालई येथील संजय भोईर कुटुंबियांचे दत्त मंदिर व बोरी नाका येथील परेश तेरडे यांच्या दत्त मंदिरात विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले.



## दिगंबराच्या गजराने उरण दुमदुमले

**। उरण । वार्ताहर ।**

दत्तजयंती ही हिंदू पंचांगात असलेल्या मार्गशीर्ष पौर्णिमा या तिथीला साजरी केली जाते. हा दिवस म्हणजे भगवान दत्तात्रेय यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. शनिवारी (दि.१४) श्री दत्त जयंती उत्सव आल्याने उरण शहर, ग्रामीण भागातील गावा गावातील श्री दत्त मंदिराना आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच, विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'च्या गजरांनी उरण परिसर दुमदुमून गेला होता.

उरण शहरातील देऊळ वाडीत श्री दत्त मंदिर असून या मंदिरात अनेक वर्षांपासून दत्त जयंती सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यावेळी हजारो भाविक श्री दत्त गुरुचे दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात गर्दी करत असतात. तसेच उरण, न्हावा शेवा पोलीस ठाणे, उरण वाहतूक पोलीस ठाण्यात देखील पोलीस अधिकाऱ्यांकडून दत्त जयंती सोहळा साजरा करतात.



● अलिबाग तालुक्यातील श्री दत्त मंदिर भुनेश्वर मुख्य व्यवस्थापक आयोजक ॲ. बी.एस. पाटील यांच्या कुटुंबीयांतर्फे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मांडवा येथील टाका देवी भजन मंडळाचे गजानन पाटील आणि मंडळी यांनी श्रुश्राव्य संगीत भजन सादर केले. तसेच, खारेपाटातील हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## कर्जतमध्ये दत्त जयंती उत्साहात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील विविध परिसरातील दत्त मंदिरात दत्तजयंती मोठ्या उत्साहात पार पडली. तालुक्यातील पळसदरी येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ मठामध्ये अन्नछत्र समितीच्यावतीने श्री दत्त जयंतीचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथे असलेल्या श्री दत्त मंदिरात देखील भक्तांनी मोठी गर्दी केली होती.



चिंचवली येथे असलेल्या खासगी दत्त मंदिरात परिसरातील शेकडो भक्तनि गर्दी केली होती. माथेरान शहरात श्री रत्नदीप प्रधान यांच्या माध्यमातून श्री दत्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला. नेरळ गावातील चिंचआळी भागामध्ये श्री गुरुदत्त मंदिरत श्री दात्त जयंतीनिमित्त तीन दिवस अखंड हरिनाम सोहळा साजरा करण्यात आला. दरम्यान, दत्त जयंतीला भक्तांनी मंदिर परिसरात दर्शनासाठी गर्दी केली होती. तसेच, तालुक्यातील कळंब येथे असलेल्या श्री दत्त मंदिर प्रति गाणगापूर येथे देखील भक्तांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

## म्हसळ्यात जयंती साजरी


**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तालुक्यातील वारळ येथील स्वयंभू श्री दत्त मंदिर येथे श्री दत्तजयंती सोहळा शनिवारी (दि.१४) मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. यावेळी पहाटे पासूनच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये काकड आरती, अभिषेक, होम, पालखी मिरवणूक, महाआरती आणि महाप्रसाद हे कार्यक्रम सकाळ सत्रात तर सायंकाळी भजन, कीर्तन आणि छ. शिवचरित्र व्याख्यान असा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने हरी बाळ्या वागे यांच्या कीर्तनचे आयोजन करण्यात आले होते. तोंडसुरे येथील दत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने गाव अध्यक्ष गोपाळ भायदे, उपाध्यक्ष तुकाराम महाडिक, ग्रामस्थ, मुंबई आणि स्थानिक मंडळ, महिला मंडळ या सर्वांनीच कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केला.

## दत्त जयंतीनिमित्त कार्यक्रम

**। तळा । वार्ताहर ।**

श्री गुरुदेव दत्त सेवा मंडळ त्वष्ठा कासार समाज तळातर्फे श्री दत्तगुरू मंदिर जिर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा उत्साहात पार पडला. दि.१०, ११, १२ व १४ डिसेंबर असे चार दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तळा शहरातील कासार आळी येथे दत्तमंदिर नव्याने बांधण्यात आल्याने मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा देखील आयोजित करण्यात आला होता. दत्तजयंती निमित्त सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. या चार दिवसात विविध धार्मिक कार्यक्रम देखील पार पडले. या कार्यक्रमासाठी तालुक्यातील भविकांसह मुंबई, ठाणे, पुणे येथे राहणाऱ्या श्री दत्त संप्रदायातील भाविक भक्त आवर्जून उपस्थित होते.



# आदिवासी वाडीला मिळाली स्मशानभुमी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

ग्रूप ग्रामपंचायत माजगाव हद्दित येत असलेल्या दोन अदिवासी वाडीला अद्याप अत्यसंस्कारासाठी स्मशानभुमी नव्हती. यामुळे खोपोलीहून वाहत आलेल्या पाताळगंगेच्या किनाऱ्यावर अत्यसंस्कार होत होते. पावसाळ्यात मोठी समस्या निर्माण होत होती. मात्र, दिपाली पाटील यांनी स्मशान भुमीचे काम पुर्ण करुन देणार असल्याचे आश्वासन दिले होते. अखेर निवडणूकीत विजयी झाल्यानंतर या ठिकाणी स्मशानभुमी बांधली. यामुळे सरपंच यांच्यासह सदस्य, ग्रामसेवक यांचे या अदिवासी बांधवांनी आभार मानले आहेत.

> **माजगाव वाडी आणी पौध वाडीतील ग्रामस्थांना स्मशानभुमी नव्हती. नदिच्या किनाऱ्यावर अत्यसंस्कार केले जात होते. मात्र, या लोकनियुक्त सरपंच दिपाली पाटील यांनी आमची मोठी समस्या मार्गी लावली आहे. यामुळे आम्ही ग्रामस्थ त्यांचे आभार मानतो.**
>
> **– कमलाकर वाघे, माजगांव वाडी**



ग्रूप ग्रामपंचायत माजगांव नेहमी विकास कामामध्ये चर्चेत असून गेले अनेक पिढ्या अदिवासी बांधवांची अत्य संस्कारासाठी होत असलेली गैरसोय आणी त्यांच्या वेदना या जवळून पाहत एक सुशिक्षित सरपंच म्हणून त्यांनी हा प्रश्न मार्गी लावला आहे. विविध समस्यांची जाणीव असून त्या सोडविण्यांचे काम महिला वर्ग करु शकते, यासाठी महिला लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडूण दिल्याचे येथिल ग्रामस्थांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना संगितले आहे.

# माणगाव येथे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन आयोजन १९ ते २५ डिसेंबर दरम्यान ताम्हाणे गावात करण्यात आले आहे. भारतीय संविधानाचा फिरक मोहत्सव, स्वच्छ भारत अभियान, सुदृढ भारत अभियान, भारतासाठी युवक या अभियानावर आधारित या शिबिराचे उद्घाटन दि.१९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता रामदास पुराणिक यांच्या हस्ते होणार आहे.

या उद्घाटनपर कार्यक्रमाला भाऊसाहेब सावंत, वैशाली जाधव, अनिल वनगुळे, रामचंद्र दाखिणकर, शशिकांत मोरे, प्रफ ुल बागल, डॉ. मोहन दोशी, सचिन वसावे, बळीराम धाडवे, सुरेश मोरे, तुकाराम पवार, रामदास दाखिणकर, चंद्रकांत धाडवे, ईश्वर पवार, संजीव मोरे, अशोक जाधव, तुकाराम पवार, रामदास धाडवे, गजानन मोरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा समारोप बुधवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता होणार आहे. शिबिराच्या समारोपाला नानासाहेब सावंत, ॲड.कौस्तुभ धामणकर, सुभाष टेंबे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

# पालीत एकांकिका स्पर्धांचे आयोजन

**। पाली । वार्ताहर ।**



माणसातील माणुसकी आपुलकीने जपणारे व्यासपीठ प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा १८ ते २४ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धेत एकूण २८ एकांकिका सादर होणार असून या स्पर्धा पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल रंगमंच येथे होणार आहेत. या स्पर्धेचे यंदाचे बारावे वर्ष असणार आहे. या स्पर्धेत ६८० कलाकार भाग घेणार आहेत. त्यामुळेच या स्पर्धेला एक वेगळेच वलय प्राप्त झाले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन अभिनेता वैभव मांगले हे करणार असून राजकीय मंडळी व प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या एकांकिका स्पर्धेत १८ ते २३ डिसेंबर या काळात दररोज ३ ते ५ एकांकिका सादर करण्यात येणार आहेत. २४ डिसेंबरला अभिनेता प्रशांत दामले, अभिनेत्री कविता मेढेकर यांच्या शुभहस्ते स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ संपन्न होणार आहे. यावेळी झी मराठी प्रस्तुत 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या नाटकाचा प्रयोग आयोजित केला आहे. या प्रयोगामुळे प्रशांत दामले व कविता (लाड) मेढेकर यांना पाहण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार असून एक उत्तम सादरीकरणाची मेजवानी प्राप्त होणार आहे. एकांकिका नियोजित दिवशी सायंकाळी ७ वाजता सुरू होतील. संपूर्ण महाराष्ट्रातून येणाऱ्या नाट्यसंस्था एकांकिका सादर करणार आहेत.

## पनवेल परिसरातील रिसॉर्टला मागणी

**पनवेल :** नववर्षाच्या स्वागतासाठी तयारी सुरू झाली असून पनवेल परिसरातील अनेक रिसॉर्ट, हॉटेल्स आणि ग्रामीण भागातील फार्महाऊसच्या बुकिंग सुरू आहेत. यासाठी मुंबईसह अनेक शहरातील पर्यटक बुकिंग करत आहेत. यावर्षी ३१ डिसेंबर रोजी मंगळवारी आहे. त्यामुळे शनिवार व रविवार हे दोन सुट्टीचे वार धरून किमान चार दिवसांच्या सुट्टीचे नियोजन करता येणार आहे. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्म हाऊस उभारण्यात आले आहेत. तसेच, अत्याधुनिक पद्धतीचे व ग्राहकांना आवश्यक असणारे साधनसामुग्रीसह रिसॉर्ट सज्ज आहेत.

# पथ विक्रेता निवडणुका बिनविरोध

**। रोहा । वार्ताहर ।**

राष्ट्रीय नागरी उप जीविका अभियान अंतर्गत केंद्र शासनाच्या नगर पथ विक्रेता समितीच्या रचनेनुसार मुख्याधिकारी अजय एडके यांच्या अध्यक्षतेखाली नगर पथ विक्रेता समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये पथ विक्रेते सभासदांसाठी विविध प्रवर्गातील आठ जागांसाठी निवडणुका पार पडल्या. या पैकी ७ जागा बिनविरोध निवडून आल्या तर एका जागेसाठी उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्यामुळे ही जागा रिक्त ठेवण्यात आली आहे. अशी माहिती सहकारी संस्थाच्या सहाय्यक निबंधक तथा निवडणुक निर्णय अधिकारी श्रीमती राखी गावडे यांनी दिली आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-भिसेगाव, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| अनुसया बळीराम चौधरी | ५०/१/अ | ०-१३-०० | १-१२ |
| अनुसया बळीराम चौधरी | ५१ | ०-३३-४० | ०-६६ |
| अनुसया बळीराम चौधरी | ५२/९ | ०-११-०० | ०-०५ |

सदरच्या जमीन मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती ह्या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १५/१२/२०२४

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमुख**
ऑफिस पत्ता. शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द ता. कर्जत जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

# आयुर्वेद महाविद्यालयातील प्रथम वर्गाचा आरंभ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




कर्जत तालुक्यातील चांदई येथे असलेल्या सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या वंदना एन. तासगावकर आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन संस्थेमध्ये पहिल्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील पहिला दिवस आरंभ दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाती आयुर्वेद शाखेत प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत आरंभ सोहळा रंगला होता. दरम्यान, आयुर्वेदमध्ये शिक्षण घेतल्यावर फिजिओथेरपिस्ट म्हणून जगभरात जाऊ शकतात आणि माझ्या महाविद्यालयातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी जगभरात जाऊन भरपूर पैसे कमवावे, असे आशीर्वाद सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एन.वाय. तासगावकर यांनी दिले.

यावेळी सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर, डॉ. संजय छाजेड, वंदना तासगावकर, मृदुला तासगावकर-कुलकर्णी, पराग ओला, डॉ. विनायक सबनीस, डॉ. रुपाली तासगावकर, डॉ. निलेश पवार, डॉ. राजू सैरासे, डॉ. रामेश्वर कानपटे, सुपर्णा पाटील, महेश काशीद, रकमांच्या तरे, रागेशेखर, डॉ.एस.आर. श्रीराज आणि डॉ. चंद्रशेखर बांगरवार आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, १) सुरेश बुधाजी सुतार, रा. नेरूळ गाव गावदेवी मंदिर, नवी मुंबई ठाणे २) विलास बाळकृष्ण पाटील रा. नेरूळ पश्चिम नवी मुंबई ठाणे येथील रहिवासी असून रविंद्र लक्ष्मण म्हात्रे यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे..

| गाव | मालक | सर्व्हे नं/ गट नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| कुरनाड | रविंद्र लक्ष्मण म्हात्रे | ५९ | ०० | ०.६०.०० | २.८२ |

वरील पैकी सुरेश बुधाजी सुतार ०.२०.०० हे.आर. व विलास बाळकृष्ण पाटील ०.२०.०० हे.आर. एवढी मिळकत खरेदी करणार आहेत.

वर वर्णन केलेली जमिन मिळकत आम्ही स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहोत. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून आमची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आम्ही स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करू व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमच्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १५/१२/२०२४ **सुरेश बुधाजी सुतार, विलास बाळकृष्ण पाटील**
रा.नवी मुंबई ठाणे
मो. ९७६९६५२१५१



# नेत्र चिकित्सा शिबीर संपन्न

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा आणि श्री सद्गुरू व्हिजन ऑपटीक्स यांच्या माध्यमातून नेत्र चिकित्सा आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय शिबिरात माथेरान मधील नागरिक आणि कामगार वर्गाने सहभागी होत मोठ्या प्रमाणात डोळ्यांची तपासणी करून घेतली.तर, संगणकीय फुल बॉडी चेकअप करून घेण्यासाठी देखील गर्दी केली होती.

माथेरान शहरातील महात्मा गांधी रस्त्यावरील आर.सी. शहा जनरल मर्चंटमध्ये दोन दिवसीय नेत्र चिकित्सा आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. श्री सद्गुरू कृपा ऑप्टिक्स यांच्या मार्फत रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्याचवेळी चष्मे बनवून देण्यात आले. संगणकीय फुल बॉडी चेकअप मध्ये एका मिनिटात शरीरातील सर्व तपासण्या करण्यात आल्या. यावेळी रुग्णांची तपासणी डॉ. भूषण शक्रावीर, डॉ. दिव्या तसेच ईशा नेत्रालयचे डॉ. सोनम शहा, डॉ. किशोरी काळे तसेच सुशील रायकर यांनी रुग्णांची तपासणी केली.

# फसवणूक करणाऱ्या महिलेला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पेण येथील पूजा भगत या फ्लॅटच्या शोधात होते. यावेळी त्यांच्या दिराच्या ओळखीचे मित्र यांनी हर्षदा चव्हाण यांच्याशी ओळख करून दिली. यावेळी हर्षदा चव्हाण यांनी त्या सिडकोमध्ये प्लॅन डेव्हलपमेंट ऑफिसर असून करंजाडे येथे स्कीममधील कमी किमतीत फ्लॅट आहेत असे सांगितले. यावेळी फ्लॅट क्रमांक ८०३ विकत घेण्याचे ठरवले. हर्षदा चव्हाण हिच्या बँक खात्यावर २५ लाख रुपये पाठवण्यात आले. तसेच, पार्किंगसाठी दीड लाख रुपये आणि प्रोसेसिंग फी ३५ हजार असे देण्यात आले. त्यानंतर त्या फ्लॅटचे स्वतःच्या घरी ई-रजिस्ट्रेशन केल्याचे सांगून सिडकोची रजिस्ट्रेशन केलेली कागदपत्रे खरी आहेत असे भासवले आणि एकूण २६ लाख ८५ हजार रक्कम स्वतःच्या खात्यावर स्वीकारली. सिडकोची दिलेली कागदपत्रे खोटी असल्याचे समजल्यानंतर फ्लॅट करता दिलेल्या रकमेपैकी ७ लाख १५ हजार रुपये भगत यांच्या पतीच्या खात्यात जमा करून १९ लाख ७० हजार रुपये परत दिले नाहीत. त्यामुळे पोलिसांनी हर्षदा चव्हाण आणि हेमराज चिंतामण ठाकूर यांना अटक केली आहे. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# चिल्हे येथे आरोग्य तपासणी

**। खांब । वार्ताहर ।**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे मोफत आरोग्य तपासणी कार्यक्रम संपन्न करण्यात आला. रोह्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीतील नामांकित दीपक नायट्रेट कंपनी यांच्या दीपक फाऊंडेशन रोहा यांच्यावतीने आरोग्य तपासणी कार्यक्रम संपन्न करण्यात आला. या मोफत आरोग्य तपासणीत विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करून व शारीरिक तपासणी करून शारीरिक तंदुरुस्तीसाठी आवश्यक सूचना देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

### जाहीर नोटीसद्वारे खुलासा

सर्वत्र जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील नं. १ श्री. संजय आत्माराम साने, नं. २ सौ. रोशन संजय साने, दोघेही रा. सोगांव, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून खालील वर्णन केलेल्या मिळकती रजिस्टर दस्ताऐवजांद्वारे संबंधीत लोकांना विक्री केलेल्या होत्या.

**मिळकतीचे वर्णन**

अ) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १८६/२, १८६/३, १८६/४, १९०/३ दिनांक १६/०९/२०२१, दस्त क्र. ३९४४/२०२१,

ब) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १९२/१, दिनांक १६/०९/२०२१, दस्त क्र. ३९४२/२०२१

क) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १९०/२, दिनांक १६/०९/२०२१, दस्त क्र. ३९४३/२०२१

ड) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १८५, दिनांक १९/०७/२०२१, दस्त क्र. ३१९२/२०२१

इ) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १९१, दिनांक १९/०७/२०२१, दस्त क्र. ३१९५/२०२१

ई) मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र. १८८, १८९, १९०/१ दिनांक १९/०७/२०२१, दस्त क्र. ३१९०/२०२१

२) त्यानंतर ताबा व मोजमाप याविषयी आमचे अशील व संबंधीत मिळकतीचे खरेदीदार यांचेमध्ये वाद निर्माण झाल्याकारणाने आमचे अशीलांच्यावतीने दिनांक ०८/११/२०२३ रोजी दैनिक कृषीवल या दैनिक वर्तमानपत्रात वादाविषयी जाहिर नोटीस प्रकाशित केलेली होती. त्या नोटीशीस अनुसरून आमचे आशिलांनी अलिबाग दिवाणी न्यायालयात स्पेशल मुकदमा नं. ९२/२०२४ हा दावा दाखल केला होता

३) परंतु, सदर मिळकतींविषयी आमचे अशील व मिळकतींचे खरेदीदार यांचेमध्ये आपाआपसांतील तडजोडीद्वारे सगळे वाद दि. १४/१२/२०२४ रोजीचे लोकन्यायालयामध्ये तडजोडीद्वारे संपुष्टात आलेले असून त्या अनुषंगाने विद्यमान दिवाणी न्यायालय अलिबाग यांचेद्वारे हुकूमनामा सुद्धा पारित झालेला आहे. सबब, आमचे अशीलांचा कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध सदर मिळकतींमध्ये राहिलेला नाही. तसेच कोणत्याही प्रकारचा सदर मिळकतींचे संदर्भात खरेदीदार व आमचे अशील यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद वा तक्रार शिल्लक राहिलेली नाही. अशारितीने मिळकत खरेदीदार हे आमचे अशीलांसमवेत झालेल्या तडजोडी पुरते सदर मिळकतींची विक्री करण्यास मुक्त व पात्र झालेले आहेत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अशीलांची सही
(१) संजय आत्माराम साने
२) सौ. रोशन संजय साने
अलिबाग
दिनांक १५/१२/२०२४

सही/-
**ॲड. सचिन बा. जोशी**
साईलाला बिल्डींग, २ मजला,
फ्लॅट नं. ३, श्रीबाग नं. २
अलिबाग रायगड
मो. क्र. ९८२२६५३६६५

### शुद्धीपत्रक

दि. १४ डिसेंबर २०२४ रोजीच्या दैनिक कृषीवलमध्ये पान नं. ५ वर ॲड. राजीव नथुराम शेरमकर यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली आहे. तरी त्या नोटीसमध्ये नजरचुकीने मौजे अलिबाग सिटी सर्व्हे नंबर ७३७ छापण्यात आला आहे तरी तो तसा न वाचता सिटी सर्व्हे नंबर ९३७ वाचण्यात यावा. तसेच त्यामधील अलिबाग नगरपालिका घर मिळकत ०.१५१४ असे छापण्यात आले असून ते सुद्धा तसे न वाचता अलिबाग नगरपालिका घर मिळकत क्र. १५१४ असे वाचण्यात यावे.

**ॲड. राजीव नथुराम शेरमकर**
रा. समर्थ को. ऑप. हौसिंग सोसायटी,
रोहिदास नगर, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

# शून्य कुष्ठरोग साधण्यासाठी 'कुसुम अभियान'

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्याकरिता आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६ ते २० डिसेंबर कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र 'कुसूम' अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जाणार आहे.

या विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित, दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. वीटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरित व्यक्ती, बांधकाम मजूर, निवासी, आश्रमशाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इ.वर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या गटातील लोक हे कामाकरिता, मजुरीकरिता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोधमोहिमेमध्येही होत नाही. ही बाब लक्षात घेऊन या घटकांसाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) राज्यात राबविण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रात तळोजा कारागृह, खाणी, बांधकामाच्या साईट्स, निवासी आश्रमशाळा अशा विविध ठिकाणी त्वचारोग तज्ज्ञ, आशा वर्कर, बहुद्देशीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थी, वीटभट्टी कामगार, खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, विविध कारणांमुळे स्थलांतरित झालेल्या व्यक्ती या व्यतिरिक्त नियमित तपासणीमध्ये वंचित राहीलेले घटक या सर्वांचे या मोहिमेंतर्गत सर्वेक्षण केले जाणार आहे.

**कुष्ठरोगाची लक्षणे :-**

१) शरीराच्या कुठल्याही भागावर फिक्कट लालसर, न खाजणारा बधीर चट्टा / डाग, त्या ठिकाणी घाम न येणे.

२) जाड, बधीर, तेलकट चकाकणारी त्वचा.

३) त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे.

४) त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे.

५) भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद करता न येणे.

६) हातातून वस्तू गळून पडणे, चालतांना पायातून चप्पल निसटणे.

७) हाताची व पायाची बोटे वाकडी असणे, हात मनगटापासून, पाय घोट्यापासून लुळा पडणे.

वरीलपैकी कोणतीही लक्षणे असल्यास मोहिमेदरम्यान येणाऱ्या शोध पथकाद्वारे तपासणी करुन घ्यावी अथवा जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करुन घ्यावी.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट – ९८२२२५७९२९

■ किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य – ९८२२२५७९२९

■ ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. ३ बेडरूम, ३ बाथरूम, किचन, हॉल, रॉयल मोटार जवळ अलिबाग, ९९७५४९०१६४

■ नोकरी! नोकरी !! नोकरी!!! * नवोदित पाहिजेत..* केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण –१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार – ₹१०,०००/– ते १२०००/– पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी – दिवस पाळी ८ तास. ठिकाण – अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.

■ बोअरवेल विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भूजल संशोधन ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

■ तत्काळ पाहिजे : अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी असिस्टंट कुक आणि वेटरची आवश्यकता आहे. संपर्क : ०८४८३९७३१०३

■ अलिबागपासून एक किलोमीटर अंतरावर एक एकर रहिवासी (R zone) जमीन रिसॉर्टसाठी लीजवर देणे आहे. संपर्क : ९९६०२६४६६०/९४२२४९४६०३

■ सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे १०/१२ वी ९२७०५६०४५६

■ आम्ही ऑनलाईन, ऑफलाईन आणि Gem पोर्टल वर AMC (वार्षिक देखभाल) सरकारी निम-सरकारी, खाजगी निविदा भरावयाचे कामे घेतो. Gem नोंदणी (Regn), सर्विस कॅटलॉग, विक्रेता नोंदणी इ. अधिक माहिती करीता संपर्क: 9987101960

■ अलिबागमध्ये समुद्राजवळ 1BHK; 641 चौ.फुट विकणे आहे. संपर्क : ८४५९८९९६०३/९२८४०८४२९१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१५ डिसेंबर**

१) श्री. विश्वनाथ गोपाळ पाटील
चेंढरे अलिबाग, १५-१२-१९४३

२) श्रीम. अपर्णा सुभाष कर्वे
चेंढरे अलिबाग, १५-१२-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**


**श्री. प्रकाश मारूती लोखंडे वाढदिवस अलिबाग**


**सनाया समीर कोरडे, वाढदिवस अलिबाग**

## मालगाडीचे दोन डबे घसरले

**पनवेल :** कोकण रेल्वे मार्गावरील कळंबोली यार्ड किलोमीटर संख्या केएलएमजी-२२ वर रेल्वे संख्या केटीआयजी-एव्हीसी एप्टी बीसीएनच्या मालवाहू रेल्वेमधील दोन रेल्वेचे डबे बुधवारी पहाटे साडेपाच वाजता घसरल्याने कोकण रेल्वे मार्गावर आपत्कालीन स्थिती निर्माण झाली.

# वाढीव करवाढ रद्द करा!

## मालमत्ता कराविरोधात नागरिक संतापले; नगरपंचायत कार्यालयाला घेराव

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**पाली नगरपंचायतीतर्फे मालमत्ता करवाढीच्या नोटीसा नागरिकांना बजावल्या गेल्यामुळे नागरिक भयंकर आक्रमक झाले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना हा अवास्तव वाढीव कर भरणे परवडणारे नाही. याविरोधात पालीतील आगरी समाज आगर आळीतर्फे बुधवारी (दि.११) पाली नगरपंचायत कार्यालयाला घेराव घालण्यात आला. तसेच मुख्याधिकारी यांना करवाढ रद्द करण्यासाठी निवेदन देण्यात आले.**



पाली शहरात नगरपंचायतीने शहरात अजूनही पुरेशा मूलभूत सोयी सुविधा दिल्या नाहीत. पालीकरांना वाटले होते की, पाली नगरपंचायत झाल्यावर देवस्थान तीर्थक्षेत्र विकास, अत्याधुनिक सांडपाणी व्यवस्था, मूलभूत नागरी सोयी सुविधा, रुंद व पर्यायी रस्त्यांची निर्मिती, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, पर्यटन विकास व शुद्ध पाणीपुरवठा योजना अंमलात येईल. शिवाय, नगरविकास खात्याकडून आलेल्या निधीचा वापर विकासकामांसाठी केल्यास नागरिकांचे जीवनमान उंचावेल. त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारेल. मात्र, तसे न होता आजही पाली शहरातील समस्या जैसे थे आहेत. आणि शासनाकडून मालमत्ता करात वाढ करून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे, असे पाली आगरी समाज अध्यक्ष ललित ठोंबरे यांनी सांगितले.

या जाचक कराबाबत पालीतील आगरी समाजदेखील एकवटला असून, सनदशीर मार्गाने आवाज उठवला आहे. यावेळी पाली आगरी समाज अध्यक्ष ललित ठोंबरे, माजी अध्यक्ष दिलीप मढवी, माजी सरपंच दिनकर काटकर, महेश खंडागळे, अनंत काटकर महिला अध्यक्ष आगरी समाज रंजना मढवी, महिला उपाध्यक्षा संजीवनी काटकर, श्रीकांत ठोंबरे, हनुमान जोशी, शरद ठोंबरे, दत्तात्रय काटकर, दिलीप खंडागळे, गोरखनाथ माळी, मिलिंद थळे आदींसह मोठ्या संख्येने आगरआळीतील महिला, तरुण व नागरिक उपस्थित होते.

## मुरुड येथे स्नेहसंमेलन उत्साहात



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जंजिरा विद्या मंडळ संचलित मार्निंग स्टार प्री पायमरी व प्रायमरी स्कूल शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. दरम्यान, जंजिरा विद्या मंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील नृत्यादिग्दर्शक अमोल कापसे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, सचिव चंद्रकांत अपराध, संचालक प्रमोद भायदे, अभय दिवेकर, उदय दांडेकर, पांडुरंग आरेकर, शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे, मॉर्निंग स्टारच्या मुख्याध्यापिका मानसी नाईक, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष शाहू काळे, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मॉर्निंग स्टारच्या प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गरबा, बंगाली, भांगडा, कोळी, लावणी असे नृत्य प्रकार तसेच प्रदूषण जनजागृती असे विविध कार्यकम उत्कृष्अपणे सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली, असे अमोल कापसे यांनी नमूद करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानसी नाईक, शिल्पा मसाल, वैशाली म्हात्रे, आत्मजा आगलावे, समृद्धी माळी, यांनी मेहनत घेतली.

## चाऱ्याच्या शोधात मेंढपाळांची भटकंती

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**



ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी मेंढपाळांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आगमन जरी होत असले, तरीसुद्धा चाऱ्याच्या अभावाने मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत आहे. ही वस्तुस्थिती सध्या तालुक्याच्या ठिकाणी निर्माण झाली आहे.

पूर्वी कोकणात मोठ्या प्रमाणात चारा असायचा. मात्र, गेल्या काही वर्षांत औद्योगिकरणाचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरल्याने शिवाय जंगले नामशेष होत असल्यामुळे त्याचबरोबर पावसाला संपताच वणवे मोठ्या प्रमाणात लागले जात असल्यामुळे या सर्व कारणावरुन मेंढ्यावर उपासमारीचे संकट निर्माण झाले आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या तीव्रतेने जाणवत आहे.

पूर्वी माळरान आणि डोंगराच्या परिसरात काटेरी वनस्पती मोठ्या प्रमाणात असायची. हेच अन्न म्हणून शेळ्या, मेंढ्या भक्षण करीत असत. यामुळे दूध उत्पादनात वाढ होत होती. मात्र, चाऱ्याच्या अभावाने आम्ही आर्थिक संकटात सापडत आहोत, असे मेंढपाळांनी सांगितले. जागा मिळेल तिथे मुक्काम आणि सकाळी पुढे प्रवासाला जाणे, असा नित्यक्रम मे महिन्यापर्यंत चालत असतो, असे मेंढपाळांनी सांगितले.

## तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन

**। तळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील गो.म. वेदक हायस्कूल येथे मंगळवारी (दि. १०) माणगाव गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेचे, हायस्कूल तसेच खासगी शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून सलाम मुंबई फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक प्रशांत उबाळे यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना तुमच्या शाळा तंबाखूमुक्त करून विद्यार्थ्यांना तंबाखूच्या विषारी व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण माहिती दिली. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी गो.म. वेदक हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. लोकरे, तळा केंद्राचे केंद्रप्रमुख मुबीन वासकर यांचे सहकार्य लाभले.

# घोषित क्षेत्रात फेरीवालेच नाहीत

## ना फेरीवाला क्षेत्रात मात्र फेरीवाल्यांची गर्दीच गर्दी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिकेच्या आयुक्तपदी गणेश देशमुख असताना पालिकेच्या चारही प्रभागांत ५२ ठिकाणी फेरीवाला क्षेत्रांची घोषणा करण्यात आली होती, तर ५४ ठिकाण ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली होती. यामुळे घोषित क्षेत्रातच फेरीवाल्यांनी आपला व्यवसाय करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र तसे होताना दिसत नसून, पालिका प्रशासनाकडून घोषित करण्यात आलेल्या ना फेरीवाला क्षेत्रात मात्र फेरीवाल्यांची मोठी गर्दी होताना दिसत आहे.

प्रभाग क्रमांक ब मधील कळंबोली वसाहतीमध्ये सायन-पनवेल मार्गावरील शिवसेना शाखा ते रोडपाली येथील पल्लवी अविदापर्यंतचा रस्ता ना फेरीवाला झोन म्हणून जाहीर करण्यात आला आहे. वसाहतीमधील याच रस्त्यावर फेरीवाल्यांची सर्वात जास्त गर्दी



असते, तर फेरीवाला क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेल्या वसाहतीमधील केएलई कॉलेज ते रोडपाली रस्त्यावर मात्र एकही फेरीवाला नजरेत पडत नाही. प्रभाग क्रमांक क मधील कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३६ येथील शिवसेना शाखा ते सेक्टर १२ येथील मनमोहन स्वीटसमोरील मुख्य रस्त्याला ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. याच भागात व्यवसाय करत असल्याचे पाहायला मिळत आहेत. पालिकेच्या चारही प्रभागात हीच स्थिती असून, पालिकेने प्रयत्न करून ना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या व्यवसायकांना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

> **ना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्यांविरोधात नियमित कारवाई सुरु आहे. फेरीवल्यांनीदेखील आरक्षित क्षेत्रात व्यवसाय करणे अपेक्षित आहे.**
> **– रविकिरण घोडके, उपायुक्त पनवेल पालिका**

### घोषित क्षेत्रातच व्यवसाय करा

**पालिकेने घोषित केलेल्या फेरीवाला क्षेत्रातच फेरीवाल्यानी व्यवसाय करणे अपेक्षित आहे. पालिका प्रशासनदेखील यासाठी प्रयत्न करत आहे. मात्र, पालिकेच्या आवाहनानंतरदेखील जे फेरीवाले ना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करतील, त्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी माहिती पालिकेमार्फत देण्यात आली आहे.**

# साप्ताहिक राशिभविष्य १५ ते २१ डिसेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### जोडीदाराची साथ मिळेल

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या कामावर अधिक लक्ष दिल्यास आपला यशाचा मार्ग अधिक सुकर होईल. आपले इतरांशी मतभेद होणार नाही याची खबरदारी घ्या. जेथे शक्य आहे तेथे तडजोडीचे धोरण स्वीकारणे योग्य होईल. कुठल्याही मोहाला बळी पडू नका. आपल्या हितशत्रूंना संधी देऊ नका. घराबाबतच्या प्रश्नांना चालना मिळेल. मुलांनी अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. वादविवादापासून दूर राहा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल तसेच तुमचा समाजात ही मान-सन्मानही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. आपण करीत असलेल्या कार्याला प्रयत्नांची जोड दिल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. आपले कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनात अधिक लक्ष द्यावे. **महिलांना-** हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दखल घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. प्रकृती जपा. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक** -१५,१६

### कामकाजात वरिष्ठांची साथ

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात मित्रमंडळी, आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे इष्ट राहील. गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची दखल घ्या. कामकाजांना प्राधान्य द्या व ते हातावेगळे करण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपण कोणतीही, कसलीही चिंता न करणे आपणास हितकारक ठरू शकते. चिंता करून प्रश्न सुटत नाही, पण त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. तेव्हा मनात येईल तसे वागण्याचा प्रयत्न करा. घरच्या समस्या सोडविता येतील. महत्त्वाचे निर्णय ज्येष्ठांशी सल्लामसलत करूनच सोडविण्याचा प्रयत्न करावा. वैवाहिक जीवनात सामंजस्याने वागणे योग्य राहील. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता असते. आपले अस्तित्व शाबूत ठेवण्यास हा काळ उत्तम आहे, पर्यायाने आपण त्याचा योग्य उपयोग करून घ्या. मात्र, कायदा व नियम यांचे पालन कटाक्षाने करा. आपल्या कार्यक्षेत्रात वरिष्ठांची उत्तम साथ मिळू शकेल. **महिलांना**-सकारात्मक दृष्टिकोनातून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. आपले आर्थिक बजेट वाढणार असल्याने आपण प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावेत. **शुभ दिनांक** -१७,१८

### प्रवासात काळजी घ्या

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करावे. व्यापार-उद्योगात प्रगती करण्याची संधी मिळेल. प्रकृतीबाबत अधिक खबरदारी घ्यावी, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, मोसमी आजार. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. आपल्या प्रकृतीची काळजी प्रामुख्याने घ्यावी. प्रकृतीबाबतची तक्रारी उद्‌भवणार नाही याची खबरदारी घ्या. आपल्या बोलण्याने गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. चुकीचा मार्ग स्वीकारणे कटाक्षाने टाळा. आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. **महिलांना**-आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. **शुभ दिनांक** -१८,२०

### विरोधकांवर अकुंश ठेवाल

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, मौसमी आजारापासून सावध राहा. नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. **महिलांना-** आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. **शुभ दिनांक** - १५,२१.

### अंगभूत कलागुणांना वाव

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सर्वांशी जुळवून घ्या. सर्व बाबतीत आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपण आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्‌भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. कौटुंबिक वावविवाद टाळा. **महिलांना**-आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. नोकरदारांना दिलासा मिळेल. घरून काम करताना जागरूक राहा. **शुभ दिनांक** -१६,१९

### आर्थिक बाजू उत्तम राहील

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात साथीदाराशी प्रेमसंबंधाने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. प्रलोभनांपासून दूर राहा. आर्थिक बाजू ठीक राहील. आपणास येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरू शकते. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आपण आपले आत्मपरीक्षण करणे योग्य. हाती घेतलेले पूर्ण करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करण्यासाठी तयारी ठेवा. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाहीत याची दक्षता घ्या. सकारात्मक विचार करून मानसिकता चांगली ठेवण्याचा प्रयत्न करा, बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न करा. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **महिलोना-** अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. **शुभ दिनांक** - १८,१९

### अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. आठवडा आपल्यासाठी संमिश्र घटनांचा ठरणार आहे. आपल्या कामाचा ताण थोडा हलका होईल. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. दाम्पत्य जीवनात छोट्या-छोट्या कुरबुरी होतील. संयम राखल्यास कामे होतील. चिंतन-मनन लाभदायक ठरेल. भविष्याची चिंता सतावेल. अनावश्यक खर्च होतील. रागावर नियंत्रण ठेवा. काळ उत्तम असेल. प्रतिष्ठा वाढेल. प्रतिकूल परिस्थिती केलेल्या कामांमुळे वरिष्ठ अधिकारी आपले कौतुक करतील. आपल्या कार्यक्षेत्रातील आपला प्रभाव वाढता राहील. नवीन ओळखीतून अचंबित करणारी वार्ता समजेल. भीतीदायक स्वप्ने पडण्याची शक्यता. **महिलांना**- जोडीदाराबद्दलचे प्रेम वाढेल. आर्थिक धोका पत्करू नका. भौतिक गोष्टींचा आनंद घ्याल. व्यवसायातील निर्णय ठामपणे घ्या. मित्रांच्या सहकार्याने अनेक कामे हातावेगळी कराल. समर्थकांच्या संख्येत वाढ होईल. भावंडांकडून शुभवार्ता मिळण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक** -१७,२०.

### ऐकावे जनाचे, करावे मनाचे

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सज्जनांशी संपर्क वाढेल. व्यवसाय, उद्योगात लाभ होतील. ऐकावे जनाचे, करावे मनाचे, या उक्तीप्रमाणे वागावे. बौद्धिक चातुर्याच्या जोरावर अनेक काम पार पाडाल. धाडस वाढेल. गुप्त विद्या आणि अध्यात्मातील गोडी वाढेल. सट्टा, जुगारापासून लांब राहा. मनोरंजनात वेळ गेल्याने मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्रात प्रगतीचे योग आहेत. वृत्तीतील गोडवा भाग्योदयासाठी अनुकूल ठरेल. विनाकारण वादात पडू नका. आठवडा आपल्यासाठी उत्तम जाणार आहे. आततायीपणा हानिकारक ठरू शकतो. बौद्धिक चातुर्याच्या जोरावर लाभ मिळतील. मान, सन्मान, ख्याती वाढेल. आत्मविश्वासात वाढ होईल. व्यवहार कौशल्यामुळे फायदा होईल. पालकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. नवे विचार, संकल्पनांची रुजवण होईल. आठवड्यात आपल्या प्रामाणिकपणाचा फायदा होईल. आपली विनम्र वृत्ती कायम ठेवा. **महिलांना-** जुने वाद संपुष्टात येतील. आपल्या गुणांमुळे लोकप्रियतेत वाढ होईल. प्राचीन ग्रंथांचे वाचन कराल. सुखात वृद्धी होईल. आठवडाभर आनंदात राहाल. श्वासासंबंधी आजार बळावण्याची शक्यता आहे. कंबर, पाठ आणि मानेचे दुखणे बळावू शकते. **शुभ दिनांक** - १५,२१

### पद, प्रतिष्ठा प्रशस्त होईल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहातआरोग्याची काळजी घ्यावी. एखाद्या गोष्टीप्रतीचे आकर्षण वाढीस लागेल. स्वभावातील गोडवा कायम ठेवा. आपल्या व्यक्तिमत्त्वातील एखादा नवा पैलू उजेडात येईल. आचरण उत्तम ठेवा. धर्म आणि अध्यात्मातील आवड वाढेल. परोपकार कराल. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. पद, प्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त होईल. संगीत, ललित कलांमध्ये विशेष रस प्राप्त होईल. समर्थक आणि विरोधक वाढतील. जोडीदाराशी वाद घालू नयेत. रागावर नियंत्रण ठेवा. या आठवड्यात आपल्या कार्यक्षेत्रात आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतील. कोणत्याही प्रकारच्या वादात पडू नये. व्यवसाय, उद्योगात डोळे बंद विश्वास ठेऊ नका. उदार मनाने एखाद्याला मदत कराल. आपल्या कष्टाची, परिश्रमांची जाहिरात करू नका. चातुर्याने समस्यांचे निराकरण करा. एखाद्याला योग्य सल्ला द्या. आठवड्यात बुद्धी चातुर्यात वाढ होणाऱ्या घटना घडतील. ग्रहांची दृष्टी असल्याने समस्या येतील. **महिलांना-** सदाचरणावर भर द्यावा. धाडस वाढेल. आपले विरोधक परास्त होतील. खुल्या मनाने मदत करावी. वादविवादात विजयी व्हाल. **शुभ दिनांक** -१६,२०

### शक्ती, सामर्थ्यात वाढ होईल

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात संशोधन क्षेत्रात असलेल्या व्यक्तींना विशेष लाभ प्राप्त होईल. आवाक्याबाहेरच्या कामांमध्ये लक्ष घालू नका. आपल्यासाठी अत्यंत शुभ असणार आहे. शक्ती आणि सामर्थ्य यात वाढ होईल. वक्तृत्व क्षमता वाढेल. शांत राहून कामे हाताळावीत. परदेशातील व्यक्तींशी संपर्क होईल. अनावश्यक खर्चात वाढ होईल. अहंकारामुळे नुकसान होऊ शकते. आर्थिक विवंचना सतावेल. कौतुक आणि प्रशंसा झाल्याने मन प्रसन्न राहील. आठवड्यात प्रभावशाली लोकांशी संपर्क होईल. हा आठवडा उत्साह वाढवणारा सिद्ध होईल. विरोधकांचे काहीच चालणार नाही. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. निरर्थक गोष्टी मनात घर करून राहतील. वादविवाद टाळावेत. आरोग्याची काळजी घेणे हिताचे ठरेल. सांधेदुखी बळावेल.

**महिलांना-** एखाद्या गोष्टीत सावधगिरी बाळगावी, अन्यथा निराधार आरोप होतील. नेहमीपेक्षा अधिक श्रम पडतील. रक्तदाब आणि मधुमेहाचे आजार डोके वर काढतील. विरोधक प्रबळ ठरतील. वाद घालू नका. व्यायाम करणे गरजेचे आहे. **शुभ दिनांक** -१७,१९

### ठेवा जिद्द, गाठाल ध्येय

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी आगामी आठवडा प्रतिकूल ठरेल. परोपकार आणि उदारता यात वाढ होईल. आपल्या गुणांमुळे लाभ होईल. हितशत्रू त्यांच्याच जाळ्यात अडकून परास्त होतील. आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व मोसमी आजारापासून सावध राहा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **महिलांना-** वादाचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल, पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. **शुभ दिनांक** -१८,२०

### प्रलंबित काम मार्गी लागतील

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात धार्मिक कार्याला वेळ द्याल. सरकारी कामात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. प्रलंबित कामे वेग घेतील. आपली कोणत्याही कारणांनी मानसिकता बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. नातलग, मित्रमंडळी यांच्या वागण्याने व बोलण्याने आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या हुशारीने, प्रसंगानुरूप वागण्याचा प्रयत्न केल्यास सारे काही साध्य करता येईल. येणाऱ्या समस्यांवर आपण त्यांचे निराकरण करू शकाल व आपल्या ध्येयाकडे वाटचाल कराल. काही भाग्यवंतांना विवाहबाबतचे प्रस्ताव येऊ शकतील. जोडीदाराशी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कायद्याचे पालन करा. आपण स्वकर्तृत्वावर लक्ष केंद्रित केल्यास पुष्कळशा गोष्टी मनासारख्या होऊ शकतील. प्रत्येकाला जबाबदारी सोपविण्यास विसरू नका. आर्थिक गुंतवणूक सध्या टाळा. **महिलांना**- प्रकृतीस्वास्थ्याकडे अधिक लक्ष द्या, उष्णतेचे विकार सांभाळा. कष्टाशिवाय यश मिळविता येत नाही, हे लक्षात ठेवा. दुसऱ्यावर कामे सोपविण्याआधी स्वयंसिद्ध व्हा व स्वकर्तृत्वावर भर द्या. **शुभ दिनांक** - २१,२३.

# वाटे आध्यात्मिक आनंद



**या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या गीताजयंती आणि दत्तजयंती या दोन्ही मंगलमय दिवसांना आपल्या संस्कृतीमध्ये विशेष महत्त्व आहे. स्वकियांशी युद्ध करतेवेळी संभ्रमावस्था अनुभवणाऱ्या पार्थाला भगवान श्रीकृष्णाने गीतेद्वारे मार्गदर्शन केले आणि केवळ त्याचाच नव्हे, तर समस्त मानवजातीला वारंवार पडणाऱ्या समस्यांच्या निराकरणाचा मार्ग दाखवला. दुसरीकडे दत्तात्रेयांनीही भाविकांवर वरदहस्त ठेवला. त्यांचेच हे स्मरण.**

उर्मिला राजोपाध्ये

माणसाला वयाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शकाची गरज असते आणि वेगवेगळ्या रुपात ती पूर्णही होत असते. मातापित्यांच्या पंखाखालून दूर होत मोकळ्या जगात विहार करताना गुरूजनच नव्हे तर, ग्रंथरुपानेही ती पूर्ण होत असल्याचा अनेकांचा अनुभव असेल. वाचन आपल्याला वैचारिक समृद्धी देतेच, खेरीज जीवनाकडे, जगण्याकडे बघण्याचा दृष्टीकोनही अधिक सुस्पष्ट करते. म्हणूनच उत्तम मार्गदर्शक, गुरू, समुपदेश मिळवणारी व्यक्ती जगण्याची विद्या आत्मसात करुन इतरांपेक्षा अनेक पातळ्यांवर पुढे जाताना दिसते. असे असताना साक्षात भगवंताने केवळ आपल्यालाच नव्हे, तर प्रत्येक मानवाला दिलेल्या शिकवणीची महती काय वर्णावी...! स्वकियांशी लढण्याची सज्जता करण्यात मानसिकदृष्ट्या कमी पडलेल्या पार्थाला श्रीकृष्णाने 'गीता' रुपाने केलेला उपदेश आणि अत्यंत कठीण परिस्थितीतही कर्तव्य श्रेष्ठ मानत टिकून कसे रहायचे, याविषयी केलेले विवेचन आज कित्येक योजना उलटल्यानंतरही आपल्या कामी येणारे आहे. म्हणूनच आजही आपण गीता जयंती साजरी करतो. त्याच बरोबरीने आलेला दत्त जयंतीचा मंगल काळही आपल्या आध्यात्मिक जाणीवा उंचावून प्रभूकृपेचा आनंद देऊन जातो. म्हणूनच मार्गशीर्षातील या दोन्ही दिवसांचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते.

महाभारताचा काळ मागे सरला असला तरी कुटुंबातील वैरभाव, समज-गैरसमजातून उद्‌भवणारे कटू प्रसंग आणि प्रसंगी आपल्याच माणसांसंदर्भात घ्यावी लागणारी कठोर भूमिका काही सरलेली नाही. एकत्र कुटुंबपद्धतीची सद्दी संपूनही मोठा काळ लोटल्यानंतरही कौटुंबिक, सामाजिक वातावरणात समोर येणारे अनेक पेचप्रसंग आपल्याला गोंधळवून टाकतात. द्वंद्वात अडकलेल्या अशा प्रत्येक जीवासाठी आजही भगवद्‌गीता हा खंबीर आधार ठरतो आणि अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नांमधून निर्माण झालेली गीता आपलीही संभ्रमावस्था दूर करते. कौरवांविरुद्ध युद्धास उभे ठाकण्याची वेळ येताच अर्जुनाची मन:स्थिती फारच नाजूक होती. युद्धभूमीवर रथ नेल्यावर आपले आप्तस्वकीय पाहून अर्जुनाच्या मनात प्रश्न उभे राहिले. मात्र अशा परिस्थितीतही भगवान श्रीकृष्णांना प्रश्न विचारण्याचे धारिष्ट्य त्याच्या मनात निर्माण झाले. कोण चूक आणि कोण बरोबर या प्रश्नाने पार्थाचे मन, अंत:करण आपण अविचार तर करत नाही ना, या विचाराने ग्रासले होते. पितृवध, गुरूवध, बंधुवध, सुहृदवध यातून मला काय मिळणार, आपण करायला निघालो आहोत ते योग्य की अयोग्य, अशा विचारांचे जाळे त्याच्या मनात पसरत होते. दुर्योधन अत्याचारी आहे, पण त्याच्या बाजूने लढणारे सर्व माझे प्रियजनच आहेत. द्रोणाचार्य भीष्मांच्या अंगाखांद्यावर तर आपण लहानाचे मोठे झालो. अशा ज्येष्ठ-श्रेष्ठांबरोबर मी कसे युद्ध करू, शस्त्र कसे उगारू, अशा मन:स्थितीत अर्जुनाला योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कोणी तरी हवे होते.

या पार्श्वभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धभूमीवर केलेला उपदेश म्हणजे गीता हे जीवनाचे सार आहे. म्हणूनच गीतेला आजच्या युगातही अनन्यसाधारण महत्त्व आहे. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी हा दिवस भगवतगीता जयंती म्हणून भारतात सर्वत्र साजरा केला जातो. भगवत्‌गीता भारतीयांच्या तना-मनात कोरलेली आहे. गीता ही धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचे सारच आहे. हे सार सर्वांना नीट कळावे म्हणून ज्ञानेश्वरांनी संस्कृतमध्ये असणारी गीता प्राकृत भाषेत आणली.

'कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
माकर्मफल हेतुर्भूर्मा ते सङ्गोडस्त्व कर्मणि।।'

अर्थात सतत चांगले कर्म कर. फळाची अपेक्षा करू नको. इतरांना मिळणाऱ्या धनावर दृष्टी ठेवू नकोस, हे श्रीकृष्णाने सांगितलेले विचार सध्याच्या काळात उपयुक्त सिद्ध होणारे आहेत. 'उद्धेरेदात्मनात्मानं नात्मानमव सादयेत्।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन:।।'
म्हणजेच माणसाने नेहमी स्वत:चा उद्धार करावा, म्हणजे स्वत:च स्वत:चा उद्धार करावा. निराश होऊ नये. बुद्धीचा वापर न केल्यामुळे शत्रुत्व निर्माण होते असे सांगणारी भगवतगीता आजही आपल्याला नवी प्रेरणा देते. वेद-उपनिषदे यांचा महान ज्ञानसागर भगवद्‌गीतेत सामावला आहे. बाळ गंगाधर टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून भगवतगीतेकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आधुनिक काळातही आपण गीतेचे तत्त्वज्ञान वापरले पाहिजे. पण आपण पूर्वीच्या युद्धपद्धती, महाभारतातील युद्धनीती-नियमांचे आचरण याबाबत कितपत विचार करतो हा प्रश्नच पडावा.

गीतेत सुखाचे तीन वर्ग केले आहेत. सात्विक, राजस आणि तामस. प्रथम विषासारखे किंवा अवघड वाटते पण नंतर गोड असते, तेच सुख सात्विक. आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून हे सात्विक सुख मिळते. राजस सुख प्रथम अमृतासारखे असते, पण शेवटी विषासारखे असते. तामस सुख हे निद्रा, आळस आणि प्रमास यापासून उत्पन्न होते. शिवाय ते प्रारंभी आणि शेवटी माणसाला मोहात पाडते. या सुखात माणूस गुंतून पडतो. सुख आणि दु:ख या एकाच नाण्याच्या दोन भिन्न बाजू. सुख कितीही मिळाले तरी कमीच वाटते तर दु:ख मिळाल्यावर आपल्याला सतत दु:खच मिळत असल्याची भावना अधिक प्रबळ होत जाते. म्हणूनच निष्काम बुद्धीने प्रयत्न, कष्ट आणि कर्म केले पाहिजे. माणसाला कर्मे सुटत नाहीत. म्हणून प्रत्येकाने आपले कर्म केले पाहिजे. मात्र, फळाची आशा न करता सतत चांगले कर्म केले पाहिजे. कामासाठी, कोणतीही लाचलुचपत, भ्रष्टाचार न करता जीवनभर काम करा, हाच संदेश गीतेने आपल्याला दिला आहे. लोकहिताची कामे कोणत्या बुद्धीने केली जातात, याला अधिक महत्त्व आहे. त्याचबरोबर मनात कोणतीच अभिलाषा न ठेवता दिलेले दान हेच खरे दान आहे, हाच संदेश गीता देते.

अहिंसा किंवा सत्य हे सर्व नीतीधर्म प्राणीमात्रांच्या हितासाठी आहेत. लोकांच्या कल्याणासाठीच धर्मशास्त्र आहे. संसार करत इतरांप्रमाणे जगातील सर्व व्यवहार विरक्त बुद्धीने करावेत असे गीता सांगते. म्हणजेच 'कर्मयोग' हीच गीतेची शिकवण आहे. धर्माला (समाजाला) ग्लानी येते तेव्हा तेव्हा त्यांचा उत्कर्ष करण्यासाठी, मी युगायुगात जन्म घेतो आणि जनहिताची कामे करतो. ती करताना माझ्या मनात आसक्ती नसते. त्यामुळे मी केलेल्या कोणत्याही कर्माचे पाप-पुण्य मला लागत नाही. निष्काम कर्म करणे हा एक श्रेष्ठ प्रतीचा यज्ञच होय, असे गीता सांगते. अनेक युगे, वर्षे लोटली तरी भारतीयांच्या मनातला गीतेविषयीचा आदर कायम आहे. पुढेही तो असाच राहणार आहे. गीतेने आपल्याला जगण्याचे तत्त्वज्ञान दिले. त्यामध्ये ज्ञान आहे, भक्ती आहे, पातंजय योग आहे, संन्यास आहे, वैराग्यही आहे. अशा या पूर्ण गीतेत, प्रत्येक अध्यायात एका साखळीतील अनेक दुव्यांप्रमाणे हा कर्मयोग आपल्याला प्रत्येक ठिकाणी सुसंबद्ध केलेला दिसतो.

या दिवसाबरोबरच मार्गशीर्षात पार पडणारा दत्तजयंतीचा सोहळाही आध्यात्मिक आनंद देणारा ठरतो. सर्वदूर पसरलेल्या दत्तसंप्रदायातील भाविकांसाठी ही मोठी पर्वणी असते. दत्तात्रेय हे अत्री ऋषी आणि त्यांची पत्नी अनसूया यांचे पुत्र. ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांच्या त्रिमूर्तीसमान पुत्र मिळावा म्हणून अनसूयेने कठोर तपस्या केली होती. सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती या पुरुष त्रिमूर्तींच्या पत्नींना अनसूयाचा हेवा वाटला आणि त्यांनी त्यांच्या पतींना तिच्या सद्‌गुणांची चाचणी घेण्यास सांगितले. त्यानुसार तिन्ही देव अनसूयेकडे साधूंच्या वेशात आले आणि परीक्षा होईल अशा प्रकारे तिच्याकडे भिक्षा मागितली. अनसूयाने त्या स्थितीतही शांत राहून एक मंत्र उच्चारला आणि तिन्ही ऋषींवर पाणी शिंपडून त्यांना बाळ बनवले आणि नंतर त्यांना दूध पाजले. अत्री आश्रमात परतल्यानंतर तिन्ही बाळांना मिठी मारली आणि तीन डोके आणि सहा हात असणाऱ्या एकाच बाळामध्ये त्यांना रूपांतरित केले. तिकडे तिन्ही देव परत न आल्याने त्यांच्या पत्नी चिंताग्रस्त झाल्या आणि त्या अनसूयेकडे गेल्या. त्यांनी तिची क्षमा मागितली आणि आपापल्या पतींना परत पाठवण्याची विनंती केली.

अनसूयाने विनंती मान्य केली. मग त्रिमूर्ती त्यांच्या नैसर्गिक रूपात अत्री आणि अनसूया यांच्यासमोर प्रकट झाली आणि त्यांना दत्तात्रेया नावाचा पुत्र दिला. आजही या देवतेची मनोभावे पूजा करणारा, उपासना करणारा मोठा वर्ग आहे. दत्त जयंतीच्या दिवशी भगवान दत्तात्रेयांची मंदिरे उत्सवाचे केंद्र होतात. भक्त यथोचित उपासना करत धूप, दिवे, फुले, कापूर यांनी भगवान दत्तात्रेयाची पूजा करतात. सदाचाराचा मार्ग साधण्यासाठी घरोघरी आणि मंदिरात भगवान दत्तात्रेयांच्या मूर्तींची पूजा केली जाते. आताही त्यानिमित्ताने मंदिरे सजली आहेत आणि लोक भगवान दत्तात्रेयाला समर्पित भजन आणि भक्तिगीतांमध्ये मग्न आहेत. काही ठिकाणी अवधूत गीता आणि जीवनमुक्त गीता देखील वाचल्या जातात. अशा प्रकारे हे दोन्ही दिवस मोठ्या भक्तीभावात साजरे होतात. ●●

## महाराणी ताराराणी स्मृतिदिनानिमित्त लेख...

# ताराबाई रामराणी भद्रकाली कोपली



**महाराणी छत्रपती ताराराणी यांची निश्चित जन्म तारीख उपलब्ध नाही. त्यांचा जन्म १६७४ सालचा असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सालात त्यांचा जन्म झालेला असावा. छत्रपती शिवाजी महाराजांचे अत्यंत शूर, कर्तृत्ववान, निष्ठावान असे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या त्या कन्या होत. तर शिवाजीपुत्र छत्रपती राजाराम महाराज यांच्या त्या महाराणी होत.**

डॉ. श्रीमंत कोकाटे

छत्रपती ताराराणी यांचे बालपण लढाया, राजकीय घडामोडी, स्वराज्य निर्मिती, संघर्ष यामध्ये गेले, त्यामुळे स्वाभाविकच वडिलांकडून त्यांना लष्करी शिक्षण मिळाले. त्या बालपणापासूनच युद्धकला राजनीतीमध्ये निपुण होत्या. छत्रपती शिवाजीराजांच्या राज्याभिषेकानंतरचा कालखंड त्यांच्या बालमनावर कोरला होता. छत्रपती संभाजीराजे, पती छत्रपती राजाराम महाराज आणि वडील हंबीरराव मोहिते यांच्या शौर्याचे, पराक्रमाचे, त्यागाचे, निर्भीडपणाचे बाळकडू त्यांना मिळाले होते. त्यांनी रायगडापासून जिंजीपर्यंत असा खडतर प्रवास जीव धोक्यात घालून केला.

पती छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली मृत्यूनंतर स्वराज्याची जबाबदारी त्यांच्यावरती आली. याप्रसंगी त्यांचे वय फक्त २५ वर्षे होते. छत्रपती शाहू महाराज मोगलांच्या छावणीत होते. त्यामुळे त्यांनी पुत्र बाल शिवाजीला (दुसरे) गादीवरती बसवून स्वत: राज्यकारभार हाती घेतला. घोड्यावर बसून त्यांनी रणांगण गाजवले, तलवार चालविली. मोगल बादशहा औरंगजेबाने ताराराणीच्या शौर्याचा, पराक्रमाचा चांगलाच धसका घेतला होता. ताराराणी यांच्या आक्रमक धोरणामुळे मुगल सम्राट औरंगजेब बादशहाची काय अवस्था झाली, याचे वर्णन समकालीन कवी पुढीलप्रमाणे करतो.

**दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचे गेले पाणी ।**
**ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ।।**
**रामराणी भद्रकाली । रणरंगी क्रुद्ध झाली ।**
**प्रलयाची वेळ आली ।**
**मुगल हो सांभाळ ।**

ताराराणीच्या पराक्रमाने औरंगजेब बादशाहा देखील खचला. त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली. त्यांचे शौर्य पाहून मोगलांसाठी प्रलय आला म्हणजे मोगलांच्या अधोगतीला सुरुवात झाली.असे तो कवी म्हणतो. छत्रपती शिवाजी महाराज राजाराम महाराजांच्या जन्म प्रसंगी म्हणाले होते ''हा माझा मुलगा पालथा जन्मला, तो दिल्लीची पातशाही पालथी घालेल'' छत्रपती शिवाजी महाराजांचे हे उद्गार त्यांच्या सुनबाई आणि राजाराम महाराजांच्या महाराणी ताराबाई यांनी खरे करून दाखविले. त्यांनी मोगलशाही खिळखिळी केली.

औरंगजेब हा सतराव्या शतकातील जगातील सगळ्यात मोठा साम्राज्यवादी होता. तसाच तो क्रूर, कपटी, पातळयंत्री, धर्मांध आणि धूर्त होता. त्याने वडिलांचा, भावांचा, मुलांचा छळ केला. त्याने अनेक साधुसंतांना मारले. त्याचे अर्ध्या आशिया खंडावरती राज्य होते. त्याचा वार्षिक महसूल सुमारे ५० कोटी होता. त्यावेळेस छत्रपती ताराराणींचा वार्षिक महसूल फक्त १ कोटी होता, अशा औरंगजेबाविरुद्ध ताराराणी सुमारे सात वर्ष निकराने लढल्या आणि त्याला महाराष्ट्राच्या मातीत गाडले. छत्रपती ताराराणी यांचा प्रचंड दरारा होता. त्यामुळे पेशव्यांना कोल्हापूर गादीकडे हस्तक्षेप करता आला नाही. शाहू महाराजांच्या सुटकेनंतर ताराराणी आणि शाहू महाराज यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. तरीदेखील शाहू महाराजांनी आपल्या या चुलतीला मातेप्रमाणे मानून त्यांचा आदर, सन्मान आणि सांभाळ केला. पुत्र शिवाजी (दुसरा) यांच्या अकाली निधनानंतर कोल्हापूर गादीची सर्व सूत्रे राजसबाईपुत्र संभाजी (दुसरा) यांच्या हाती गेली. १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह झाला आणि त्या तहानंतर ताराराणी सातारला शाहू महाराजांच्याकडे आल्या. शाहू महाराजांनी त्यांना मातेप्रमाणे सांभाळले.

ताराराणी अत्यंत महत्वाकांक्षी होत्या. त्यांच्याकडे दांडगी राजकीय इच्छाशक्ती होती. स्त्री असल्याचा कोणताही न्यूनगंड त्यांनी आयुष्यात कधीही बाळगला नाही. त्यांचा प्रशासनावरती वचक होता. त्या स्वत: उत्तम राज्यकर्त्या होत्या. त्या अत्यंत धोरणी, मुत्सद्दी आणि शौर्यशाली होत्या. त्यांनी शाहू महाराजांना राज्यकारभारामध्ये मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य केले. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांनी आपला नातू रामराजे यांना सातारच्या गाडीवरती बसविले.

महाराणी ताराराणी आणि पेशव्यांमध्ये मोठा संघर्ष होता. पेशव्यांचा कपटीपणा त्यांनी ओळखला होता. त्यामुळे त्यांनी नेहमी पेशव्यांविरुद्ध भूमिका घेतली. ताराराणी आणि नानासाहेब पेशवे यांच्यामध्ये मोठा संघर्ष होता. पेशव्यांचे धोरण त्यांना पसंत नव्हते.

महाराणी ताराराणी यांच्या जीवनामध्ये अनेक संकटे आली. वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्यांना वैधव्य आले. त्या सती गेल्या नाहीत. वैधव्याने खचून न जाता त्यांनी निर्भीडपणे राज्यकारभार केला. मोगलांबरोबरच अंतर्गत शत्रूचा त्यांनी बंदोबस्त केला. ताराराणी संकटसमयी लढणाऱ्या होत्या, रडणाऱ्या नव्हत्या. जिजाऊमासाहेब, छत्रपती शिवाजीराजे, सरसेनापती हंबीरराव मोहिते, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज यांचा शौर्यशाली वारसा त्यांनी पुढे चालविला.

छत्रपती ताराराणी यांचे जीवनचरित्र सतत सर्वांना प्रेरणा देणारे आहे. स्त्रीसुद्धा हिंमतवान असते, कर्तृत्ववान असते, बुद्धिमान असते, शौर्यशाली असते, हे ताराराणी यांनी जगाला दाखवून दिले. वंशाला दिवा फक्त मुलगाच असतो असे नव्हे, तर मुलगीसुद्धा वंशाला दिवा असते, हे ताराराणी यांनी दाखवून दिले. शिवकाळात पुरुषाप्रमाणे स्त्रियादेखील घोड्यावर बसून रणांगण गाजवणाऱ्या, तलवार चालविणाऱ्या होत्या, हे ताराराणी यांनी दाखवून दिले. छत्रपतींच्या घराण्यांमध्ये धर्मसंस्कृतीच्या नावाखाली स्त्रियांना राजवाड्यामध्ये बंदिस्त केले जात नव्हते, तर त्यांना राज्यकारभार आणि लढायांचे स्वातंत्र्य दिले जात होते, हे स्पष्ट होते.१४ जानेवारी १७६१ च्या पानिपतावरील लढाईत पेशव्यांच्या पराभवाची बातमी ऐकून ताराराणी म्हणाल्या ''बर झालं पेशवाई बुडाली.'' पेशव्यांची ध्येयधोरणे महाराणी ताराराणी यांना मान्य नव्हती. त्यांनी उघडपणे पेशव्यांच्याविरुद्ध भूमिका घेतली. स्वराज्याच्या विरोधात जाणाऱ्या लोकांचा त्यांनी कधी मुलाहिजा बाळगला नाही. त्या निर्भिड होत्या, तशाच सडेतोड देखील होत्या. महाराणी ताराराणी यांना ८७ वर्षाचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. ९ डिसेंबर १७६१ रोजी त्यांचा मृत्यू झाला. शिवाजी महाराज ते रामराजे हा मराठ्यांचा इतिहास पाहिलेल्या त्या अत्यंत अनुभवी राजनीतिज्ञ होत्या. त्या आपल्यासाठी शौर्याचा, पराक्रमाचा, स्वाभिमानाचा, निर्भिडपणाचा वारसा देऊन गेल्या. स्वराज्याचे संवर्धन आणि संरक्षण करणाऱ्या छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन ! ●●

# प्रेम... प्रेम... प्रेम...

निलेश साठे



प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं..... तुमचं आमचं अगदीच सेम असतं. हे फक्त वाचण्यासाठी आणि बोलण्यासाठी असतं. आमचं वेगळं असतं. प्रेमाच्या बाबतीत माझ्या एवढा जगात दुसरा कोणी दुर्दैवी नसेल असे मी नेहमी म्हणायचो. पण तसं नाही. जगात लाखो तरुण आहेत त्यांना प्रेम मिळाले नाही. एखाद्या सुंदर तरुणीने आमच्याकडे बघून हलकसं स्माईल केलं तर आम्हाला वाटणार ती आम्हाला पटली. मग लगेच आम्ही तिच्यावर जीव ओवाळून टाकायला तयार. पण आम्ही कोणाला कितीही जीव लावा. त्यांचा ठाम नकार. चेहराच तसा आहे आपला. नाही म्हणजे नाहीच. अरे मी तुझ्याकडे त्या नजरेने नाही बघत असं सर्वांग सुंदर उत्तर कितीतरी वेळा मिळालेलं. मग असे वाटते आपल्या पूर्वजांचे आपल्यावर खरोखर कितीतरी उपकार आहेत. ज्यांनी अरेंज मॅरेज ची सुविधा उपलब्ध करून ठेवली आहे. अन्यथा माझ्यासारखे लाखो तरुण उपाशीच मेले असते. दुसऱ्यांचं प्रेम तुम्हाला पाहायला मिळेल पण प्रत्यक्षात प्रेम तुम्हाला मिळणार नाही. प्रेम मिळवण्यासाठी माझ्यासारखे लाखो तरुण नाना उपद्व्याप करत असतात. एकदा सहज बोलता बोलता मित्र म्हणाला आईटम पटवायची असेल ना तर तुझ्याकडे बाईक पाहिजे. बाईक असेल ना तर आयटम लगेच पटते. बस्स... एवढेच त्याचे शब्द ऐकले. आणि त्या शब्दांनी इतका प्रेरित झालो. इतकं मोटिवेशन मिळालं की झपाटून कामाला लागलो. दिन रात मेहनत घेतली. बाईक चालवता येत नव्हती. ती शिकलो. आणि रोख रकमेने बाईक विकत घेतली. तीही नवीकोरी. वर्षा मागून वर्ष सरले. आयटम ना फायटम कसले काय. घंटा कोणी नाही मिळालं. एकदा असंच मित्र मित्र बोलत असताना एक जण म्हणाला बाईला प्रपोज करायचं असेल तर फोरविलर मध्ये बसवायचं आणि चालत्या गाडीत प्रपोज मारायचा. बाई नाही म्हणणारच नाही.

त्याच्या या वाक्याने अंगात बारा हत्तीचे बळ आलं. पुन्हा, तितकाच प्रेरित झालो. पुन्हा दिन रात मेहनत घ्यायला सुरुवात केली. आणि एक चार चाकी घेतलीच. कर्ज काढून का होईना पण घेतलीच. नवीन कोरी गाडी विकत घेऊन स्वत:च्याच गाडीवर ड्रायव्हिंग शिकणारा मी कदाचित पहिला मध्यमवर्गीय ड्रायव्हर असेन. तीन वर्ष गाडीचे हप्ते भरून भरून बेजार झालो. ना कुठल्या बाईला प्रपोज मारता आला ना कुठला तसा प्रसंग उद्‌भवला. शेवटी गाडी विकली. मी इथे जिंकलो का हरलो? मला प्रेम मिळालं नाही कधी. पण प्रेमाची भावना मला खूप सुंदर वाटते. मी त्या भावनेने प्रेरित होतो. मला स्फूर्ती येते एनर्जी येते, उत्साह येतो काम करण्याची नवी उमेद मिळते. हे तेव्हा मला जाणवलं. प्रत्यक्षात प्रेम मिळालं नाही तर काय झालं. त्या भावनेनेच मी माझ्या आयुष्याची प्रगती तर करून घेतली. ही आहे प्रेमाची ताकद. प्रेम प्रत्येकाला मिळावं. प्रेमामध्ये प्रचंड ताकद असते. रात्र रात्रभर कोणासाठी तरी जागणं कोणासाठी तरी आपण गीत गुणगुणणं, कोणाच्यातरी आठवणीने एका वेगळ्याच दुनियेत मस्त रममाण होणे ही भावनाच मुळात किती सुखावह आहे. अर्थात ही भावना मला जरी प्रत्यक्षात अनुभवता नाही आली. तरी सिनेमांमध्ये किंवा इतर प्रेमी युगुलांचे अनुभव पाहून मला प्रेम म्हणजे धरती वरचं स्वर्ग सुखच वाटते. प्रेमात असलेले तरुण-तरुणी खूप स्वच्छ आणि निर्मळ मनाची असतात. अशी माझी खात्री आहे. प्रेमाने जग जिंकता येते. प्रेमाने जगावर राज्य करता येते. म्हणून प्रेमाची नदी नेहमी वाहत असली पाहिजे. ज्यामुळे संपूर्ण जगामध्ये प्रेम आनंद सुख नांदेल. सगळीकडे प्रेम प्रेम आणि प्रेमच असेल. हेवा द्वेष मत्सर कुठे ही नसेल. आणि संपूर्ण मानव जातीला धरतीवरच सर्व सुखाची प्राप्ती होईल. ●●

## स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या

# नफा तोटा

बाजारातील वस्तूंची किंमत ठरविण्यासाठी आणि व्यवसाय किती फायदेशीर आहे हे समजून घेण्यासाठी गणितामध्ये नफा आणि तोटा सूत्राचा वापर केला जातो. प्रत्येक उत्पादनाची किंमत आणि विक्री किंमत असते. या किंमतीच्या मूल्यांच्या आधारे आपण एखाद्या विशिष्ट उत्पादनासाठी मिळालेला नफा किंवा तोटा मोजू शकतो. या ठिकाणी या लेखात, किंमत, स्थिर चल, अर्ध परिवर्तनीय किंमत, विक्री किंमत, चिन्हांकित किंमत, सूची किंमत, मार्जीन इत्यादी तसेच नफा आणि तोटा टक्केवारी सूत्र शिकू उदा. एखाद्या दुकानदाराला खरेदी विक्रीच्या किंमती पेक्षा जास्त असेल तर तो तोटा होतो. येथे या लेखात आपण त्यावर आधारित समस्या सोडविण्याच्या युक्त्यासह नफा आणि तोटा संकल्पनांवरचर्चा करू.

१) **नफा** (P) :- एखादे उत्पादन त्याच्या किंमती पेक्षा जास्त किंमतीला विकून मिळवलेली रक्कम.

२) **तोटा** (L) :- नुकसान. एखाद्या विक्रेत्याने उत्पादनाची किंमत त्याच्या किंमती पेक्षा कमी विकल्या नंतर जी रक्कम मिळते ती तोटा म्हणून नमूद केली जाते.



आकडेमोड
**राजेंद्र पाटील**
९८२२३०२०८५

३) **किंमत** (CP) :- एखादी वस्तू उत्पादन किंवा वस्तू खरेदी करण्यासाठी भरलेल्या रक्कमेला किंमत म्हणतात.

४) **विक्री किंमत** (SP) :- ज्या रक्कमेसाठी वस्तू अथवा उत्पादन विकले जाते त्याला विक्री किंमत म्हणतात.

५) **दर्शनी किंमत** :- वस्तूची विक्री करण्यापूर्वी ती वस्तू केवढ्यास विकायची आहे हे निश्चित केले जाते. त्यानुसार वस्तूवर तिची किंमत छापली जाते. त्या किंमतीस छापील किंमत अथवा दर्शनी किंमत असे म्हणतात.

६) **सूट** :- गिऱ्हाईकाला आकर्षित करण्यासाठी व आपला माळ अधिक खपण्यासाठी दुकानदार छापील किंमतीपेक्षा कमी किंमतीस वस्तू विकतो या सवलतीस सूट असे म्हणतात.

**महत्वाची सूत्रे**

१) नफा= विक्री किंमत - खरेदी किंमत.
२) तोटा= खरेदी किंमत - विक्री किंमत.
३) खरेदी= विक्री+ तोटा
४) खरेदी= विक्री-नफा
५) विक्री= खरेदी+ नफा
६) विक्री= खरेदी- तोटा
७) शेकडा नफा = $\frac{\text{एकूण नफा} \times १००}{\text{खरेदी किंमत}}$
८) शेकडा तोटा= $\frac{\text{एकूण तोटा} \times १००}{\text{खरेदी किंमत}}$
९) १०० रु खरेदी किंमतीवर होणारा नफा शेकडा नफा समजतात.
१०) १०० रु. खरेदी किंमतीवर होणारा तोटा शेकडा तोटा समजतात.

११) खरेदी किंमत, विक्री किंमत आणि नफा अगर तोटा या तीन बाबी पैकी कोणत्याही दोन बाबी दिल्या असता तिसरी काढता येते.

१२) विक्री किंमत = $\frac{\text{प्रत्यक्ष नफा} \times (१००+ \text{शे.नफा.})}{१०००}$

१३) खरेदी किंमत = $\frac{\text{विक्री किंमत} \times १००}{१००- \text{शेकडा नफा}}$

१४) खरेदी किंमत = $\frac{\text{विक्री किंमत} \times १००}{१०० - \text{शेकडा तोटा}}$

१५) छापील किंमत = $\frac{\text{खरेदी किंमत} \times (१०० + \text{शेकडा नफा})}{१०० - \text{शेकडा तोटा}}$

१६) नफा व तोटा यांना निव्वळ नफा व निव्वळ तोटा असेही म्हणतात.

१७) शेकडा नफा किंवा शेकडा तोटा हा नेहमी खरेदी किंमतीवरच काढतात.

१८) शेकडा नफा किंवा शेकडा तोटा म्हणजे प्रति शंभरला किती असे होय.

१९) खरेदी किंमतीलाच मूळ किंमत असे म्हणतात.

२०) एखाद्या वस्तूची खरेदी किंमत काढताना त्यामध्ये मालवाहतूक भाडे, वाहन भाडे, मजुरी- हमाली, दलाली, नोंदणी शुल्क, विमा इंधन इत्यादी खर्च समाविष्ट करावा लागतो. व येणारी रक्कम मी खरी खरेदी किंमत होय.

२१) शेकडा सूट व शेकडा नफा दिला आहे. छापील किंमत व खरेदी किंमत या पैकी एक किंमत दिली असता दुसरी किंमत काढणे.

उदा. दुकानदाराने चष्म्याच्या छापील किंमतीवर शे. २० सूट देतो तरीही त्याला १२% नफा होतो. चष्म्याची छापील किंमत २८०० असल्यास चष्म्याची खरेदी किंमत किती?

उत्तर:- खरेदी किंमत = $\frac{\text{छापील किंमत} \times (१००- \text{शेकडा सूट})}{(१००+ \text{शेकडा नफा})}$

$= \frac{२८०० \times (१००-२०)}{१००+१२}$

$= \frac{२८०० \times ८०}{११२} = २०००$

२२) दोन वस्तूंची विक्री किंमत समान व त्या विकून एकीपासून होणारा शेकडा नफा व दुसरी पासून होणारा शेकडा तोटासमान असेल तर त्या व्यवहारात तोटाच होतो.

उदा. राजूने दोन सायकली प्रत्येकी २४०० रु. ला विकल्या त्याला एका खरेदीच्या २०% नफा व दुसऱ्यात २०% तोटा झाला. तर व्यवहारात शेकडा नफा अथवा तोटा किती झाला?

शेकडा तोटा = $\frac{(२०)^२}{१००} = \frac{४००}{१००}$ = ४% तोटा

शेकडा तोटा = $\frac{(\text{शेकडा तोटा}) २}{१००}$ एवढा असतो.

२३) छापील किंमत रु.९९००/- असणाऱ्या यंत्रावर दुकानदार शेकडा १० टक्के सूट देतो तरी दुकानदारास शेकडा १० टक्के नफा होतो. तर त्या यंत्राची खरेदी किंमत किती रुपये असावी.

छापील किंमत ९९००/- रु वर शेकडा १०% सूट म्हणजे ९९० रु. सूट
यंत्राची विक्री किंमत बरोबर ९९००-९९०= ८९१० रु.
यंत्र ८९१० रु ला विकले तरी १० टक्के नफा होतो.= ९९१ रु
८९१०-९८१= ७९२९ रु. यंत्राची मूळ किंमत.

२४) शेकडा नफा अगर तोटा काढणे

१२०० रुपयांस विकत घेतलेली फळे घरी आणण्यासाठी ३०० रु. खर्च आला. सर्व फळे विकून १८३० रुपये जमले तर या व्यवहारात झालेला शेकडा नफा अगर तोटा किती ?

उत्तर १२०० रु. खरेदी+ ३०० रु खर्च = १५०० रुपये खरेदी किंमत.

१८३० रुपये विक्री -१५०० रुपये खरेदी = ३३० रुपये नफा

१५०० रुपये खरेदीवर ३३० रुपये नफा

शेकडा नफा = $\frac{३३० \times १००}{१५००} = २२$

उत्तर शेकडा नफा= २२

२५) खरेदीवर किंमत काढणे

एक सायकल १८३० रुपयांस विकल्यामुळे शेकडा २२ नफा झाला तर त्या सायकलची खरेदीची किंमत किती असावी.

आपण खरेदी किंमत १०० मानू

१०० रुपये खरेदीवर २२ नफा = १००+२२ = १२२

१२२ रुपये विक्री असल्यास १०० रुपये खरेदी

१८३० रुपये विक्री असल्यास

$\frac{१०० \times १८३०}{१२२}$ = १५०० रुपये खरेदी ●●

## विलक्षण वाचनीय आठवणी

# मी योजिले मनाशी ...

मी योजिले मनाशी..., हे कवी आणि गजलकार ए.के.शेख यांचे आत्मचरित्र पुण्याच्या महाजन पब्लिशिंग हाऊसने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. चरित्र आणि आत्मचरित्रांतून संबंधित व्यक्तीच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची वाचकाला ओळख होत असते. 'मनोगत' मध्ये अब्दुल रहमान करीमभाई शेख म्हणतात, ''जीवन हे एक काव्य आहे'' या पुस्तकातून त्यांच्या जीवनाचा जीवनपट उलगडून दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. ''हे साध्यासुध्या माणसाचं चरित्र आहे'' असा उल्लेखही ते करतात. ''माणूस होत गेलो...'' आणि ''दोन शब्द माझे..'' या शीर्षकान्वये कवी, समीक्षक रोहिदास पोटे आणि आद्यमराठी- महिला- गजलकार संगीता जोशी यांनी सविस्तरपणे शेख यांच्या जीवनाविषयी सोदाहरण लिहिले आहे. पुस्तकाचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ नीलम आर्ट्स यांचे आहे. या पुस्तकात छोटीमोठी चोवीस प्रकरणे समाविष्ट आहेत.




ए.के. शेख यांचा जन्म ३० मार्च १९४६ चा, पारगावचा. पुणे जिल्ह्यातील हे एक छोटेसे गाव. दोन मुलींच्या पाठीवर मुलगा जन्माला आल्याने सर्वांनाच अतिशय आनंद झाला. त्याकाळच्या गावातील विविध आठवणी शेख यांनी सविस्तरपणे सांगितल्या आहेत. त्यांच्या घरात परंपरेने मुलाणकी होती. वडिलांच्या पोस्टातील नोकरीमुळे केडगावला भाड्याच्या घरात बिऱ्हाड थाटले गेले. तेथील मंगळवारच्या भरणाऱ्या बाजाराचे वर्णन शेख यांनी अतिशय बहारदारपणे केले आहे. केडगाव आणि नंतर पारगावला, त्यांचे प्राथमिकशिक्षणझाले. आईकडूनगाण्याचेसंस्कार झाल्याने, शाळेतील प्रार्थनेचे काम अब्दुलकडेच होते. शाळेतील, गावातील विविध जाती आणि धर्मांतील सण-समारंभाचे सविस्तर अनुभव शेख यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. त्यांचे माध्यमिक शिक्षण, विद्या विकास मंदिर, केडगाव येथे झाले. या गावातील आणि शाळेतील विविधांगी अनुभव विलक्षण पद्धतीने आणि सविस्तर मांडले आहेत. सुट्टीच्या काळात गावातील हनुमान मंदिरात अब्दुल पांडव प्रताप, शिवलीलामृत अशा विविध पोथ्या, गावातील प्रौढ, अल्पशिक्षित स्त्री-पुरुषांसमोर वाचत असे. गावकऱ्यांनाही अब्दुलचे कौतुक वाटत असे. पोथी समाप्तीच्या वेळी, बहुजन समाजातील सर्व हिंदू श्रोते गावजेवण करीत. त्यावेळी अब्दुलचा विशेष आदर सत्कार केला जाई.

''पण तेव्हाही आणि आजही आपण काही विशेष केले आहे असे कधी वाटले नाही.वाटतही नाही.'' असे शेख नम्रपणे नमूद करतात.

ए.के. शेख यांनी आपल्या शिक्षण काळात, सर्वांशी प्रेमळ वागण्याने आणि सर्वांना शक्यतो मदत करण्याच्या वृत्तीतून, अनेक माणसे जोडली होती. वाढत्या घरखर्चासाठी काम करून, कुटुंबाला काही आर्थिक मदतही शाळकरी वयातील अब्दुल करीत असे. शालेय जीवनात ए.केंना वाचन लेखनाची आवड निर्माण झाली. विशेषतः काव्य करण्याची! त्या काळात सर्वच गरीब होते, पण खाऊनपिऊन सुखी होते. गावात उत्तम एकोपा होता. परस्परांना मदत केली जात असे. एस.एस. सी.उत्तीर्ण झाल्यावर पुण्याला शाहू कॉलेजमध्ये काही वर्षे शिक्षण घेतले. प्राचार्य मंगुडकरांच्या सल्ल्याने आणि परवानगीने अब्दुल आणि काही अन्य गरीब विद्यार्थी कॉलेजच्या वर्गातच राहत होते. त्याकाळात 'बिनाका गीतमाला' हा कार्यक्रम ऐकण्याचे त्यांना त्यांच्या मित्रांसह जणू वेडच लागले होते. अठरा वर्षे पूर्ण होताच ए.के. यांना नोकरीचे निमंत्रण आले. वडिलांप्रमाणेच त्यांनी पोस्टातील नोकरी स्वीकारली. मात्र तत्पूर्वी आईने त्यांना एअर फोर्स भरतीसाठी, संधी असूनही पुत्रप्रेमामुळे, हट्टाने रोखले होते.

पुस्तक परीक्षण
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

नोकरी निमित्ताने ते पनवेलला पोस्टात हजर झाले. पहिल्या दिवस अखेरीस त्यांच्याजवळचे सर्व पैसे संपले होते. आता कुठे जायचे, हा प्रश्न होता. त्यावेळी पटेल नावाच्या पोस्टमनने त्यांची सर्व व्यवस्था केली. त्या पहिल्या रात्री त्यांचा प्रथमच डासांशी परिचय झाला. हळूहळू ते पोस्टाच्या कामात रमले, तरबेज झाले. प्रामाणिकपणाने आणि सर्वांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे त्यांनी पोस्टात आणि सर्वत्र अनेक माणसे जोडली. नंतर त्यांनी पोस्टातील कर्मचाऱ्यांच्या युनियनचे काम करून अनेक सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविल्या.

१४ मार्च १९६९ रोजी त्यांचा विवाह झाला. सुन्नाचे नाव त्यांनी नसीमा असे केले. नसीमा ही पतीकेंद्रित होती. आपल्या मुलांप्रमाणेच नोकरी काळात आणि नंतरही अन्य भावंडांचे, त्याचप्रमाणे त्यांच्या मुलांचेही स्वतः अनेक अडचणी झेलून, उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांचे संसार लावून दिले. तरीही त्यांना काही कौटुंबिक अनुभवांना सामोरे जावे लागले. आईवडील आणि नंतर निवृत्तीनंतर, नसीमाच्या मृत्यूमुळे ते एकाकी झाले. वर्षदीड वर्षानंतर त्यांनी फरीदाशी लग्न केले. तिच्यासह हाजयात्राही केली. त्याचे सविस्तर वर्णन ए.के. यांनी केले आहे. नोकरीकाळात आणि नंतरही त्यांचे गजलचे लेखन आणि गजलशी निगडित कार्यक्रम सुरूच आहेत. पुस्तकाचे शेवटी त्यांचा सविस्तर परिचय आणि त्यांना वेळोवेळी प्राप्त विविध पुरस्कार यांची माहिती सविस्तर दिली आहे.

''मी योजिले मनाशी...'' द्वारे ए. के. शेख यांनी आपली जीवनकहाणी वाचकांसमोर ठेवली आहे. त्यामधील विविध अनुभव अतिशय हृद्य आहेत. काही प्रसंग वाचकांच्या डोळ्यांत अश्रू उभे करतात. त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे त्यांचे जीवन यशस्वी, कृतार्थ झाल्याचे जाणवते. सुयोग्य मुद्रितशोधनाअभावी काही सदोष शब्द आणि अन्य त्रुटी राहून गेल्याचे जाणवते. या पुस्तकातील विविध अनुभव जणुकाही त्या काळाचे चित्रच वाचकांसमोर उभे करतात. त्यांची स्मरणशक्ती आणि जिद्द जबरदस्त असल्याचे जाणवते. ●●

**पुस्तकाचे नाव : मी योजिले मनाशी...**
**लेखक : ए. के. शेख. पनवेल.**
**प्रकाशक : महाजन पब्लिशिंग हाऊस**
**मोबा. : ९१३७६८६१०७**
**बादशाही लेन, पुणे.**
**पहिली आवृत्ती : ३० मार्च २०२३**
**पृष्ठे :३३६, मूल्य : रु. ६७५/-**

# 'भूतदयेचा... देवमाणूस...'

''भाऊंका बोलवक होया... त्या शिवाय ह्या कोणाक जमाचा नाय

सदलो गावडे अतिशय गंभीर स्वरात नाना फडतुलेला समजावत होता. शेतकऱ्यांवरचे संकट हे सगळे गावकरी एकत्र येऊन सोडवतात. इतरवेळी जमिनीच्या वादातून.. बंधाऱ्याच्या वादातून एकमेकांशी तावातावाने भांडणारी माणसे आपल्या शेतकरी शेजारी मित्रावर संकट आले तर प्राण जरी द्यावा लागला तरी मागे हटणार नाहीत. या बाबतीत माणूसकीच्या भावबंधाचे अतूट नाते गोळवण गावाच्या एकसंघतेचे प्रतिक प्रकर्षाने जाणवते. जमिनीच्या वादावरून हाणामारी तर कधी पोलिस स्टेशनची पायरी तरीही शेतकरी शेजारी मित्राचे एखादे जनावर आजारी असले तर हे शेजारी आवर्जून उपस्थित राहतात. अशा वेळी परस्परांचे वैर विसरले जाते. तिथे असते केवळ आणि केवळ आत्मियता दिसते. आपलेपणा आणि शेजारधर्माचे पालन दिसते. माणुसकीचे उत्तम उदाहरण पाहावयास मिळते.

आज नाना फडतुलेची गाभण म्हैस अडली होती. जमिनीवर पडली होती डोळे पांढरे पडले होते. चारा तसाच पडला होता. चाऱ्याला गोमटा म्हैशीने तोंडही लावले नव्हते. नानी फडतुलेने आज पेडाजुयाच्या शेतातून 'कर्पिल' नावाचा गवतीचारा आणला होता. पण गोमटा ही तिची लाडकी म्हैस आजारी होती. नानीने सकाळपासून अन्नाचा कणही तोंडात घेतला नव्हता. नाना फडतुलेचीही तऱ्हा तीच होती.

वाड्यात वाडीतील बरीच माणसे जमली होती. अनेकजण आपापल्या परीने उपचार सांगत होते. म्हैशीची प्रसूती अडकली होती. आडवी ताट पडून होती डोळे पांढरे फटीक उघडे होते. तिच्या वेदना जाणवत होत्या सर्वांच्याच डोळ्यातून अश्रू येण्याची अवस्था निर्माण झाली होती.

''नाना आता लय उशीर करून चालाचा नाय... तु हयता कंदील घे आणि गावठाणात जा... भाऊंका घेवन ये बघू...'' दाजी सावंत नानाला म्हणाला. नाना जाण्याच्या तयारीला निघणार एवढ्यात राजू सिवाजम बोलला,

''नानानू तुम्ही हयसरच थांबा मिया बेगीना जावन येतंय... तुमी काय काळजी करु नको... भाऊंका मी घेवन येतंय... आमी खेका आसव हयहर???''

धनंजय शेटये

''जा... राजू... आता उशीर नको करू... जा आमी हयसर आसव.... गोमट्याक उठवक चार माणसा होयी हत'' बाबगो परब बोलला.

'भाऊ गव्हाणकर' ही व्यक्ती म्हणजे गोळवण गावातील देवमाणूस होय. संतांना मी कधी पाहिले नाही. परंतु संत असतील तर नक्कीच भाऊंसारखेच होते असतील. रात्री-अपरात्री शेतकरी बांधवांच्या गुराढोरांच्या आजारपणात विनाशुल्क उपचार करून त्या जनावराचे प्राण वाचवायचे.कितीही थकलेले असले तरी भाऊही कधी उपचारासाठी नकार दिल्याचे माझ्या ऐकिवात नाही. कित्येक जनावरांना संजीवनी देणारा महान पशूवैद्य म्हणजे एकमेव भाऊ होय. कधी कुणाकडूनच औषधोपचाराचे पैसे घेतल्याचे ऐकिवात नाही. कित्येक मुक्या प्राण्यांचे आशीर्वाद लाभले असतील या महात्म्याला...

अशा महान व्यक्ती जवळ कुठल्याही वैद्यक शास्त्राची पदवी नसेल परंतु अनेक विद्यापीठांच्या पदव्या फिक्या पडतील असं अगाध ज्ञान त्यांच्याजवळ असेल. गोळवण गावाचे खरे रत्न हेच आहेत.

राजू धापा टाकत भाऊंना घेऊन नाना फडतुलेच्या म्हैशीच्या वाड्याजवळ पोहोचला. नानी फडतुलेनी परातीतून वीस पंचवीस कप कोरा चहा आणला.. मालवणी भाषेत कोरे बिनदुधाचा चहा 'फुटी चाय' म्हणतात. फुटीचाय सर्वांनी घेतला.

''लय उशीर केलास.... हिचा 'आंग आला' हा.... पण नाना तुमी काय काळजी करु नुको.. भाऊंनी नानाला धीर दिला.

म्हैशीची अवस्था अतिशय गंभीर झाली होती. प्रसूती काळात वासरू बाहेर येण्याआधी अडथळा निर्माण झाला होता. हा अडथळा म्हणजे बाहेर आलेले 'अंग' होय. यालाच मालवणी भाषेमध्ये 'आंग येणे' असे म्हणतात. यावेळी म्हैस आणि वासरू दोघेही दगावण्याची भीती असते. तसं पाहिलं तर गावामध्ये पशुवैद्यकीय दवाखानाही उपलब्ध नव्हता.... सर्व काही 'भाऊ' च करायचे. पण कमालीचा अनुभव पाठीशी होता. लोकांचा प्रचंड विश्वास होता. एकवेळ देवावर कमी असेल परंतु 'भाऊ'च्या वैद्यकीय उपचारावर जास्त विश्वास गोळवण गावच्या लोकांचा होता.

नानी फडतुले खूप काळजीत होती. भाऊंनी कुठूनतरी झाडाचा पाला आणला तो खलबत्त्यात उगाळून त्याचा लेप दिला. गोमटा म्हैस अत्यावस्थ होती. औषधोपचार झाल्यावर अवघ्या दहा मिनिटातच गोमटा म्हैस उभी राहिली. खरंतर प्रत्यक्षदर्शी मी तिथे होतो. भाऊंच्या या उपचारपद्धतीला तोड नाही. अचंबित करणारा वैदिकशास्त्राचा व्यासंग होता. अशा उपचारपद्धतीपुढे भले भले पशूचिकित्सा वैद्यसुद्धा चाट पडतील यात शंकाच नाही.

भाऊंचं व्यक्तिमत्त्व आपल्याला एक विश्वव्यापकतेची एक वेगळीच शिकवणूक देऊन जाते. भुतदयेचा परिपूर्ण धडा शिकवते. प्राणीमात्राबद्दलचे जीवापाड असलेले प्रेम हे त्यांच्या औषधोपचारातुन दिसते. बरं या व्यक्तीबद्दल काय बोलावं... कमालीचा शांत स्वभाव...प्रांजळ हास्य... सदानकदा मदत करण्यासाठी तत्पर असलेली निर्मळ विचारांची स्वच्छ चारित्र्याची अतिशय आदरणीय व्यक्ती म्हणजे 'भाऊ' होय. देव खरंतर दगडाच्या मूर्तीत शोधत बसण्यापेक्षा आपल्या आजूबाजूला माणूसकीने माणसात शोधा त्यांचे अस्तित्व नक्कीच जाणवेल. किमान माझ्यातरी पाहण्यातला देव माणूस म्हणजे हे भाऊच होय.


नानी फडतूलेच्या चेहऱ्यावर आज जो आनंद ओसंडून वाहत होता त्याला तोड नव्हती. गोमटा म्हैस.... त्या मुक्या प्राण्याच्या डोळ्यातुन ओघळणारे अश्रू आणि गोमट्या म्हैशीची ती नजर जणू भाऊंची कृतज्ञता व्यक्त करीत असल्याचा भास माझ्या मनात होत होता.

''अरे फटकेक गावलास व्हरान ते....आता थांबान काय करतलास गोमट्याची सुटका झाली मारे??? आता खरवसाक येवा... '' शंकरतात्याने सगळ्यांना प्रेमळ ताकिद दिली. सगळ्यांच्याच चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद तरळत होता.

भाऊ आता औषधोपचार करून परत चालले होते त्यांच्या पाठमोऱ्या निर्विकार आकृतीकडे पाहताना एक विलक्षण भक्ती त्या देवमाणसाबद्दल मनात घर करुन गेली. त्यांच्या कर्तृत्वाला सलाम! आपण केलेल्या औषधोपचारासाठी पैसे वगैरे घेतलेले कधी ऐकीवात नाही, भूतदयेने ओतप्रोत भरलेले व्यक्तिमत्त्व, निष्काम सेवा करणारं आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजे भाऊ गव्हाणकर होय. माझे वडील भाऊ गव्हाणकर यांचे जीवलग मित्र होते. बाबा भाऊंजवळ लाकुड चिरकाम करायचे. माझ्या शिक्षणासाठी वेळीअवेळी पैशाची गरज पडली तर भाऊ लागलीच पैसे काढून द्यायचे रक्कम कीती आहे? यांचा विचार ते कधीच करत नसत.गरीब मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये हेच त्यांना वाटायचे. ताबडतोब ती रक्कम बाबांजवळ द्यायचे. मी शिक्षण पूर्ण करु शकलो ते अशा देवमाणसांच्या सहकार्यामुळेच! ●●

# आता मंडप व मिरवणुकीवरही दंड लावावा?





नुकतीच शहरात एक प्रकारची जनजागृती होत आहे आणि केली जात आहे. ती जनजागृती आहे, हेल्मेट वापराविषयीची. हेल्मेट हा आपल्या सुरक्षेचा विषय असून शासनानं गतकाळातच हेल्मेट वापरासंबंधी नियम बनवले. ज्यात दुचाकी चालकाला आणि चालकाच्या पाठीमागं बसणाऱ्यालाही हेल्मेट वापरणं शासनानं सक्तीचं केलं. आता जर या दोहोंपैकी एकानं जरी हेल्मेट वापरला नाही तर दंड होणार आहे. ज्यातून दंड म्हणून आलेल्या रकमेतून देशाचा विकास करता येईल. तेच धोरण राबवून नवीन कायदा असाही बनावा की मंडप टाकणाऱ्याला व नवरदेवाची मिरवणूक काढणाऱ्यालाही दंड व्हावा. जेणेकरुन त्यातून पैसा मिळेल व तोही पैसा देशाच्या विकासाच्या कामी येईल.

अलिकडील काळ म्हटलं तर दिखाव्याचा काळ आहे. या काळात गरीब कोणी आहे, असा दिसत नाही. लोकं श्रीमंत आहेत व त्यातच ही श्रीमंती एखाद्यावेळेस विवाह सोहळ्यात दिसून येते. लोकं आजच्या विवाहसोहळ्यात एवढा पैसा खर्च करतात की ज्याची गणतीच करता येत नाही. प्रसंगी त्या विवाह सोहळ्याला रंगीत बनविण्यासाठी लोकं कर्जही काढत असतात. पुर्वीही विवाहसोहळे व्हायचेच व विवाह सोहळ्यात लोकं आज जेवढा खर्च करतात. तेवढा खर्च करीत नसत तर त्यांची जेवढी चादर असायची. तेवढीच ते पसरायचे. ज्यातून त्या परीवारावर कर्जाचं डोंगर उभं राहात नसे. मात्र आज तसं नाही. आज शान वाढली आहे, ज्याला आपण दिखावा म्हणतो. लोकांजवळ आज पैसाच पैसा असेल असं वाटतं. त्यांचा तो भरजरी पोशाख, ती त्यांची लाली, ती त्यांच्या चेहऱ्यावरची सजावट. ते पाहून असं वाटतं की यांच्याजवळ पैसा किती असेल? परंतु प्रत्यक्षात शहानिशा झाल्यावर कळतं की त्यांच्याजवळ अजिबात पैसा नाही. ते फक्त दाखवणं असतं. विवाह सोहळ्याबाबतीतही असंच आहे. जवळपास जरी पैसा नसला तरी लोकं विवाह सोहळ्यात एवढा पैसा खर्च करतात की वाटतं संबंधीत गृहस्थ किती श्रीमंत असेल. ती रोषणाई, ती सजावट, ते जेवण सगळं काही एखाद्या अतिश्रीमंत माणसालाही लाजवेल असंच असतं. अलिकडील काळात कर्जामुळे आत्महत्या होत असल्याच्या घटना वारंवार घडत असलेल्या दिसून येत आहेत. कधी शेतीतून निर्माण झालेल्या आत्महत्याही दिसतात. त्यातील काही आत्महत्या या विवाह करण्यासाठी कर्ज उचलल्यानं व त्या कर्जाचा भरणा करता न आल्यानं, त्यातच त्याचं व्याज वाढल्यानं आणि त्यातच हफ्तेवसुलीवाले आपलं घर, आपली मालमत्ता जप्त करत असल्यानं निराशा येत असते व आत्महत्या घडते. हे सगळं जरी बरोबर असलं आणि आपल्यासमोर ते जीवंत उदाहरण असलं तरी आपण विवाह करतांना कर्ज हे उचलतोच. शिवाय त्या कर्जाची परतफेडही आपल्यानं होत जरी नसेल तरी आपण कर्ज उचलतो. त्याचं कारण आहे, शेजारील व्यक्ती घोड्यावर नाचतो ना. मग आपणही घोड्यावरच नाचायला हवं. परंतु त्यावेळेस आपण असा विचार करीत नाही की तो व्यक्ती त्याच्या नशिबानुसार श्रीमंत आहे, आपण त्याची बरोबरी करु शकत नाही. आपण लहानतोंडी मोठा घास घ्यायला नको. आपण लहानतोंडी लहानच घास घ्यावा. परंतु आपण तसे करु तेव्हा ना. आपण तसं करीत नाही व त्याच्यासारखंच वागायला पाहतो. ज्यातून आपण समस्येत फसतो कारण शेजारील व्यक्ती आपण उपाशी असतांना आपल्याला जेवण आणून देत नाही. उलट त्याला मजाच वाटते. विवाहसोहळ्यात चमकधमक असते. त्यातून असं दिसतं की विवाहसोहळ्यात किती खर्च करतात हे लोकं. ज्यात रोषणाई तिही गाण्याच्या तालावर थिरकणारी, ते त्या वधू वरांचं नृत्य. जणू स्वर्गातील इंद्र अप्सरेसोबत नृत्य करीत आहे आणि तो स्वर्गच आहे, असं धुशार वातावरण. या सर्व गोष्टी आज विवाहसोहळ्यात असतात. ज्याला अतोनात पैसा लागणार नाही तर काय? शिवाय असे करीत असतांना जो पैसा लागतो. तो पैसा आज काही लोकांजवळ असतो. सर्वांजवळ नसतोच. अन् ज्यांचेजवळ असतो, ती मंडळी खर्च करीत असतात. त्यांना तो पैसा खर्चही करायला किंतू परंतु वाटत नाही. कारण तो त्यांचा स्वकष्टानं कमविलेला पैसा नसतो. परंतु ज्यांचा पैसा स्वकष्टानं कमविलेला असतो. तो व्यक्ती जर असा खर्च करीत असेल तर ही बाब विचारात घेण्यालायक असते. कारण स्वकष्टाचा पैसा हा अशा विवाहसोहळ्यातील एवढा अवाढव्य थाट करायला पुरत नाही. त्यातच कर्जच काढावं लागतं. महत्वपुर्ण बाब ही की आपल्याजवळ जेवढं आहे, तेवढीच चादर पसरावी. कारण दुसरा आपल्याला थंडी वाटत असल्यास चादर देत नाही. तसं पाहिल्यास कोरोनाच्या साथीपासून बरीचशी मंडळी सुधारली आहेत व ती मंडळी आता जास्त अतोनात पैसा खर्च करीत नाहीत. ते आता विवाह सोहळ्यासाठी एखादा सभामंडप न ठरवता आपल्याच घरासमोर मंडप टाकतात. तो त्यांचा खर्च वाचतोच. परंतु यात काही महाभाग एवढे चालू असतात की ते अख्ख्या रस्त्यावर मंडप टाकत असतात. ज्यात मंडप टाकतांना साधे पादचारी चालायलाही जागा सोडत नाहीत. मग गाडीवाल्यांचं ठीक असतं की त्यांना तो मंडप पाहता गल्ली फिरुन जातांना त्राण लागत नाही. थोडंसं पेट्रोल लागतं.

ते रहदारीचा रस्ता बंद करीत असतात. ज्यात त्या रस्त्यावर रहदारी करणाऱ्यांची गैरसोय होत असते. ते शासनाची परवानगीही घेत नाहीत. तशी परवानगी घेण्याला महत्व देत नाही. कारण शासनानं सध्यातरी त्यावर कंबर कसलेली नाही. रस्त्यावर मंडप टाकणारी मंडळी ही जास्त श्रीमंत नसतात. ती गरीबच असतात. परंतु संपुर्ण रस्ता बंद करुन ते विवाह सोहळे साजरे करीत असतात. ज्यातून नागरिकांना त्रास होत असतो. ठीक आहे की जिथे सोयच नाही, त्याठिकाणी रस्ता बंद करायलाच हवा. परंतु जिथे सोय असते, तिथेही रस्ता बंद केला जातो. जणू तो रस्ता त्याच व्यक्तीच्या मालकीचा असतो. शासनानं खरं तर असे मंडप जे गल्लोगल्लीत टाकले जातात. जे रहदारीचा रस्ता अडवतात. त्या रस्ता अडविण्यावर कारवाईच करायला हवी. चांगला दंडच लावायला हवा. कारण रहदारी करणाऱ्यांची अशा गोष्टींनं गैरसोय होत असते. कारण काही ठिकाणी मोठी जागाही असते. परंतु अशी जागा जरी असली तरी काही लोकं रहदारी करायला गल्ली सोडत नाहीत अन् त्यांना काही म्हणायला गेल्यास ते अरेरावी करतात.

अंकुश शिंगाडे

अलिकडे लोकं घरासमोरच मंडप टाकू लागले आहेत. काही विवाह सोहळे करु लागले आहेत तर काही बारसे, अक्करमासे, जयंत्या, पुण्यतिथ्य, वाढदिवस करु लागले आहेत. काही लोकं रस्त्यानं नवरदेवाच्याही मिरवणुका काढू लागले आहेत. ज्या मिरवणुकीतून रहदारी करायला मोठ्या अडचणीही निर्माण होत असतात. शिवाय अशी मिरवणूक काढणारी माणसं त्यांच्याच मालकीचा जणू रस्ता असल्यागत बादशाही थाटात चालत असतात. ते चालणाऱ्यांना रस्ताही देत नाहीत. ज्यात कधीकधी कोणाला अर्जंट जायचं असतं. कधी कोणाला अटॅक आलेला असतो व त्यातच त्या व्यक्तीचा जीव वाचवणं अगदी महत्वाचं असते. परंतु अशा उत्सवप्रसंगी वा मिरवणूक प्रसंगी जायला पुरेशी जागा न मिळाल्यानं शेवटी मरण पत्करावं लागतं. इथे जाणाऱ्याचा जीव जातो मंडप आणि मिरवणुकीच्या माध्यमातून. अन् त्यांना आनंद होतो. कारण सुग्रास जेवण मिळत असते म्हणून. म्हणूनच याबाबत विशेष सांगायचं झाल्यास शासनानं अशा मिरवणूक व रस्त्यावर टाकण्यात येणाऱ्या मंडळावर आवर घालावा व असा आवर घालण्यासाठी त्यांच्यावर दंड ठोकावा. या बाबींकडे विशेष लक्ष द्यावे, जेणेकरुन त्यातून राज्याचा महसुलही वाढू शकतो व त्या परिसराचाच नाही तर देशाचाही विकास साधू शकतो हे तेवढंच खरं. ●●

# शिवशक्तीची शिरोडकर स्पोर्ट्सवर मात

**जय भारत विजय क्लबकडून पराभूत**





**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय मिल मजदूर संघ आयोजित कामगार महर्षी गं.द. आंबेकर स्मृती कबड्डी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील महिला गटात अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम लढतीत शिवशक्तीने डॉ. शिरोडकर स्पोर्ट्स क्लबचा ३५-३० असा पराभव करीत जेतेपद पटकावले आहे. पुरुषांच्या स्थानिक गटात विजय क्लबने जय भारत क्रीडा संघाचा पराभव करत बाजी मारली तर व्यावसायिक गटात स्वामी समर्थने रिझर्व बँक स्पोर्ट्स क्लबचा ३४-३२ असा अवघ्या दोन गुणांनी पराभव करीत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले आहे.

द्वितीय श्रेणीत जय शंकर चौक यांनी, तर कुमारी गटात शिवकन्या मंडळोन उपांत्यपूर्व फेरीत धडक दिली आहे. महिलांच्या गटात शिवशक्ती महिला संघाला जेतेपद पटकावताना डॉक्टर शिरोडकर स्पोर्ट्स क्लबशी कडवी झुंज द्यावी लागली. मध्यंतराला शिवशक्तीकडे २०-१६ अशी चार गुणांची आघाडी होती. दुसऱ्या सत्रात शिरोडकरच्या चढाई पटूंनी जोरदार संघर्ष करत शिवशक्तीशी बरोबरी साधण्याचा वारंवार प्रयत्न केला होता. मात्र, ते थोडक्यात अपयशी पडले आणि शिवशक्तीने ३५-३० असा विजय मिळवत आपल्या जेतेपदांची मालिका कायम राखली आहे. व्यावसायिक गटात स्वामी समर्थ आणि रिझर्व बँक स्पोर्ट्स क्लब यांच्यातला अंतिम सामनाही अत्यंत चुरशीचा झाला.

या लढतीत रिझर्व बँक स्पोर्ट्स क्लबच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत मध्यंतराला १३-११ अशी दोन गुणांची आघाडी आपल्याकडे राखली होती. मात्र, दुसऱ्या सत्रात स्वामी समर्थच्या चढाई बहाद्दरांनी वेगवान खेळ करत आधी बरोबरी साधली आणि नंतर आघाडी घेत ती शेवटपर्यंत कायम राखत जेतेपदही पटकावले आहे. त्यांनी हा संघर्ष ३४- ३२ असा जिंकला.

तसेच, जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत चेंबूर क्रीडा केंद्र प्रथम श्रेणी गटाच्या चौथ्या, तर उत्कर्ष मंडळ तिसऱ्या फेरीत दाखल झाले आहेत. पुरुषांच्या स्थानिक गटात मात्र विजय क्लब आणि जय भारत क्रीडा संघात झालेला अंतिम सामना अत्यंत एकतर्फी झाला. विजय क्लबच्या खेळाडूंनी प्रारंभीच पल्लेदार चढाई करत १७-५ अशी आघाडी घेत सामन्यावर वर्चस्व मिळवले आहे. दुसऱ्या सत्रातही जय भारतच्या खेळाडूंचे काहीही चालू शकले नाही. परिणामतः विजय क्लबने ही लढाई २७-१३ अशी सहज जिंकली आहे.



# राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेचे उद्घाटन

**■ महाराष्ट्र राज्य फिल्ड इनडोर तिरंदाजी निवड चाचणी स्पर्धा**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

फिल्ड आर्चरी ओसो. ऑफ महाराष्ट्र यांच्यातर्फे फिल्ड आर्चरी ओसो. ऑफ रायगड यांच्या यजमानपदाखाली आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या महाराष्ट्र राज्य फिल्ड इनडोअर तिरंदाजी निवड चाचणी स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. ही स्पर्धा अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात खेळवली जात आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.१४) रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अलिबाग प्रेस असो. अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेमदर अतनूर, फिल्ड आर्चरी ओसो. महाराष्ट्राचे महासचिव सुभाषचंद्र नायर, फिल्ड आर्चरी ओसो. महाराष्ट्र उपाध्यक्ष रितिका नायर, गणेश गावडे, फिल्ड आर्चरी असो. ऑफ रायगडचे सचिव संतोष जाधव, मिलिंद पांचाळ, वैभव सागवेकर, अजिंक्य अडकर, लाभेश तेली आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेतून महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार असून हा संघ उत्तर प्रदेशातील लखनौ येथे होणाऱ्या राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत सहभगी होणार आहे.

# उतेखोल बीटच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील उतेखोल बीट स्तरावरील क्रीडा आणि व्यक्तीमत्व विकास स्पर्धा जावळी हायस्कूल येथे शुक्रवारी (दि.१३) उत्साहात संपन्न झाल्या. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन माणगाव गट शिक्षण अधिकारी सुरेखा तांबट यांचे हस्ते करण्यात आले.

स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी राज्य सरकारी कर्मचारी समन्वय समिती अध्यक्षा विनया जाधव यांनी बक्षीसे म्हणून आकर्षक चषक दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उतेखोल केंद्र प्रमुख शंकर शिंदे, प्रकाश उभारे, गणेश खामकर, संतोष मालोरे, विलास गिते, मुख्याध्यापक बरगे, निलेश साळवी, बोरसे, विनया जाधव, अरुणा भांडवीलकर, शुभांगी जाधव, स्मिता पाबरेकर, दिनेश खडतर, अस्मिता खडतर, केकाणे तसेच पालक वर्ग, शिक्षक वृंद यांनी सहकार्य केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेले विद्यार्थी तालुका स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणार आहेत.





**लहान गट:** लगोरी स्पर्धा: प्रथम- उतेखोल, द्वितीय- ढालघर. लंगडी: प्रथम- ढालघर, द्वितीय- उतेखोल. पारंपारीक नृत्य: प्रथम- उतेखोल, ढालघर, द्वितीय- पेणतळे, तृतीय- पळसगाव. समूहगीत: प्रथम- उतेखोल, द्वितीय- ढालघर, तृतीय- पळसगाव. पथनाट्य: प्रथम- पेण/तळे, द्वितीय- उतेखोल, तृतीय- ढालघर. माती शिल्प: प्रथम- उतेखोल, द्वितीय- पळसगाव, तृतीय- ढालघर. दोरी उड्या: प्रथम- पळसगाव, द्वितीय- ढालघर, तृतीय- उतेखोल. बेचकिने नेम धरणे: प्रथम- गांगवली, द्वितीय- पेण तर्फे तळे, तृतीय- पळसगाव

**मोठा गट:** लगोरी: प्रथम- गांगवली, द्वितीय- पेण तर्फे तळे, तृतीय- पळसगाव. लंगडी: प्रथम- गांगवली, द्वितीय- पेण तर्फे तळे. समूह गीत: प्रथम- गांगवली, द्वितीय- पळसगाव, तृतीय- पेण तर्फे तळे. पथनाट्य: प्रथम- पळसगाव, द्वितीय- पेण तर्फे तळे, तृतीय- गांगवली. पारंपरिक नृत्य: प्रथम- पेण तर्फे तळे, द्वितीय- गांगवली. माती शिल्प: प्रथम- पेण तर्फे तळे, द्वितीय- पळसगाव. दोरी उड्या: प्रथम- गांगवली, द्वितीय- पेण तर्फे तळे, तृतीय- पळसगाव. बेचकिने नेम धरणे: प्रथम- पेण तर्फे तळे, द्वितीय- गांगवली, तृतीय- पळसगाव.

# तमिळची पाटणा संघाला कडवी लढत

**। पुणे । प्रतिनिधी ।**

तमिळ थैलवाज संघाने पाटणा पायरेट्स संघाला कडवी लढत दिली. मात्र, पाटणा संघाने हा सामना ४२-३८ असा जिंकला आणि प्रो-कबड्डी स्पर्धेमधील आपले आव्हान राखले आहे. पूर्वार्धात पाटणा संघाकडे २०-१५ अशी पाच गुणांची आघाडी होती.


म्हाळुंगे-बालेवाडीमधील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये या स्पर्धेच्या लढती सुरू आहेत. सामन्यात सुरुवातीपासून आघाडी घेतली की प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंवर दडपण येते, ही रणनीती उपयोगात आणून पाटणा संघाने सुरुवातीपासूनच आघाडी मिळवण्याचा प्रयत्न केला होता. सामन्याच्या अकराव्या मिनिटालाच त्यांनी पहिला लोण चढवला. त्यावेळी त्यांनी १६-८ अशी आघाडी घेतली. तमिळ संघाने पिछाडी भरून काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यामध्ये त्यांना यश आले नाही. मध्यंतराला पाटणा संघ पाच गुणांनी आघाडीवर होता.





तसेच, पुणेरी पलटनने बंगळूरू बुल्स विरूद्ध दणदणीत विजय मिळवला आहे. सामना पुर्णतः एकतर्फी झाला, ज्यामध्ये पुणेरी पलटनने ५६-१८ अशा फरकाने बाजी मारली. बंगळूरू संघाने मिळवलेल्या अवघ्या ११ चढाई गुणांमध्ये प्रदीप नरवालने ३ गुणांचे योगदान दिले. सुरूवातीपासूनच यजमानांनी सामन्यात वर्चस्व राखले होते. मध्यंतरापर्यंत पलटनकडे १९ गुणांची आघाडी होती. व सोनाअंतीपर्यंत पलटनने आघाडी दुप्पट केली. पलटनने घरच्या मैदानावर सर्व क्षेत्रात उत्तम कामगिरी करत बुल्सला पराभवाची धुळ चारली.

# गॅबा कसोटीवर पावसाचे व्यत्यय



**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत संघात होत असलेल्या कसोटी मालिकेचा तिसरा सामना शनिवारी (दि.१४) सुरू झाला. हा सामना ब्रिस्बेनमधील द गॅबा स्टेडियमवर होत आहे. मात्र, शनिवारी ब्रिस्बेनमध्ये पावसाचा जोर चांगलाच होता. त्यामुळे या सामन्याच्या पहिल्याच दिवशी पावसाचा व्यत्यय आला असून केवळ ८० चेंडूंचा म्हणजेच १३.२ षटकांचा खेळ झाला. पावसाचा जोर कायम राहिल्याने पहिल्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला असून आता रविवारी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पुढील खेळाला सुरुवात होणार आहे.

पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाने १३.२ षटकात बिनबाद २८ धावा केल्या आहेत. सलामीवीर नॅथन मॅकस्विनी ४ धावांवर आणि उस्मान ख्वाजा १९ धावांवर नाबाद राहिले. आता पहिला दिवस वाया गेल्याने उर्वरित चार दिवशी खेळ अर्धातास लवकर सुरू होणार असून ९८ षटकांचा खेळ होईल. म्हणजे भारतीय प्रमाणवेळेनुसार आता पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी रविवारी (दि.१५) खेळाला सुरुवात होणार आहे.

दरम्यान, भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियन संघ प्रथम फलंदाजीला उतरला आहे. ढगाळ वातावरणातही ऑस्ट्रेलियन सलामीवीरांनी संयमी खेळ करताना भारतीय गोलंदाजांना सुरुवातीला यश मिळू दिलेले नाही. या सामन्यात ६ व्या षटकादरम्यानही पावसाचा पहिल्यांदा व्यत्यय आला होता. ज्यामुळे साधारण १५ मिनिटे खेळ थांबला होता. पण नंतर १४ व्या षटकात पावसाचा जोर वाढला. त्यानंतर मात्र पाऊस कायम राहिल्याने पुढे खेळ झाला नाही.

# कार्ल हॉपकिन्सन मुंबईच्या ताफ्यात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल मेगा लिलावानंतर सर्व संघांनी आगामी आयपीएलच्या सरावाला सुरूवात केली आहे. फ्रँचायझींच्या प्रशिक्षण शिबीरालाही सुरूवात झाली आहे. अशातच मुंबई इंडियन्सने विश्वचषक विजेत्या प्रशिक्षकाला ताफ्यात सामील करून घेतले आहे.

इंग्लंडचा क्षेत्ररक्षक प्रशिक्षक कार्ल हॉपकिन्सन मुंबई संघाच्या प्रशिक्षक संघात सामील झाला आहे. आगामी आयपीएल हंगामात कार्ल हॉपकिन्सन मुंबई इंडियन्सचा क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून काम पाहाणार आहे. कार्ल हॉपकिन्सन इंग्लंडच्या २०१९ विश्वचषक, टी-२० विश्वचषक २०२२ विजेत्या संघातील प्रशिक्षक संघाचा भाग होता. २००० मध्ये त्याने ससेक्स संघाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास सुरूवात केली. २००३ला त्याने स्कॉटलँडविरूद्ध पहिला राष्ट्रीय सामना खेळला. या सामन्यात त्याने १९ धावा देत ३ बळी घेतले व ६७ धावांची खेळी केली. त्याने आपल्या कारकिर्दित एकूण प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. ज्यामध्ये त्याने एकूण २७०५ धावा केल्या आहेत व २ बळी मिळवले आहेत. त्याचबरोबर ९२ लिस्ट ए सामन्यांमध्ये १४०० धावा व ३ बळी घेतले आहेत.



# आफ्रिकेचा पाकवर दणदणीत विजय

**। केप टाऊन । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान संघ सध्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर असून टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेतील सेंच्युरियनला झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ७ गडी राखत दणदणीत विजय मिळवला आहे. यासह तीन सामन्यांची टी-२० मालिका २-० अशी विजयी आघाडी घेत खिशात टाकली आहे.

या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेसमोर २०७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग दक्षिण आफ्रिकेने १९.३ षटकात ३ गडी गमावत २१० धावा करत पूर्ण केला. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. एका बाजूने सलामीला उतरलेला रिझा हेंड्रिक्स चांगला खेळत असताना दुसऱ्या बाजूने रायन रिकल्टन आणि मॅथ्यू ब्रित्झके यांनी स्वस्तात विकेट्स गमावल्या. मात्र, रिझाला रस्सी वॅन डर ड्युसेन याने भक्कम साथ दिली. या दोघांनी दीडशतकी भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेला विजयाचा मार्ग दाखवला. हेंड्रिक्सने वादळी खेळ केला. त्याने ५४ चेंडूत त्याचे शतक पूर्ण केले. हे त्याचे पहिलाच आंतरराष्ट्रीय टी-२० शतक आहे. शतक केल्यानंतरही तो आक्रमक खेळत होता, पण १८ व्या षटकात त्याला अब्बास आफ्रिदीने बाद केले. त्याने ६३ चेंडूत ११७ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतरही ड्युसेनने धावांची गती कमी होऊ दिली नाही. त्याने हेन्रिक क्लासेनला साथीला घेत अर्धशतक पूर्ण करण्यासोबतच दक्षिण आफ्रिकेला २० षटकात विजयही मिळवून दिला.





**वेस्ट इंडिज विरूद्ध भारतीय महिला संघाची घोषणा**

# आगामी मालिकेसाठी संघात मोठे बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने शुक्रवारी (दि.१३) भारतीय महिला संघाची आगामी एकदिवसीय आणि टी-२० मालिकांसाठी घोषणा केली आहे. भारतीय महिला संघाला १५ डिसेंबरपासून वेस्ट इंडिज महिला संघाविरुद्ध मायदेशात ३ सामन्यांची एकदिवसीय आणि ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. भारत आणि वेस्ट इंडिज महिला संघात १५, १७ व १९ डिसेंबर रोजी नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. तसेच, २२, २४ व २७ डिसेंबर रोजी वडोदरामधील कोटांबी स्टेडियमवर एकदिवसीय मालिका खेळवली जाणार आहे.

भारतीय संघ नुकताच ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरून एकदिवसीय मालिका खेळून परतला आहे. या एकदिवसीय मालिकेत भारताला व्हाईटवॉशचा सामना करावा लागला. या पराभवानंतर आता वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी मालिकांसाठी भारताच्या संघात मोठे बदल करण्यात आले आहेत. या मालिकांसाठी स्फोटक फलंदाज शफाली वर्माला संधी देण्यात आलेली नाही. तिला ऑस्ट्रेलियाविरुद्धही संधी दिली नव्हती. याबरोबरच अरुंधती रेड्डीलाही संघातून वगळण्यात आले आहे. याशिवाय यष्टीरक्षक नंदीनी कश्यप, फलंदाज राघवी बिस्त आणि अष्टपैलू प्रतिका रावल यांना पहिल्यांदाच भारताच्या महिला संघात संधी देण्यात आली आहे. बिस्त आणि कश्यप यांना भारताच्या टी-२० संघात संधी दिली आहे, तर रावलला एकदिवसीय संघात संधी देण्यात आली आहे. तनुजा कंवर हिलाही एकदिवसीय संघात संधी मिळाली आहे.





**एकदिवसीय संघः**
हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), प्रतिका रावल, जेमिमाह रॉड्रिग्स, हरलीन देओल, रिचा घोष (यष्टीरक्षक), उमा चेत्री (यष्टीरक्षक), तेजल हसबनीस, दीप्ती शर्मा, मिन्नू मणी, प्रिया मिश्रा, तनुजा कंवर, तितस साधू , सायमा ठाकोर, रेणुका सिंग ठाकूर.

**टी-२० संघः**
हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), नंदिनी कश्यप, जेमिमाह रॉड्रिग्स, रिचा घोष (यष्टीरक्षक), उमा चेत्री (यष्टीरक्षक), दीप्ती शर्मा, सजना सजीवन, राघवी बिस्त, रेणुका सिंग ठाकूर, प्रिया मिश्रा, तितस साधू, सायमा ठाकोर, मिन्नू मणी, राधा यादव.

# वासीम, अमीरची दुसऱ्यांदा निवृत्ती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेटमध्ये गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. त्यातच शुक्रवारी (दि.१३) अष्टपैलू इमाद वासीमने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून दुसऱ्यांदा निवृत्ती घेण्याची घोषणा केली होती. त्याच्या पाठोपाठ आता वेगवान गोलंदाज मोहम्मद अमीरनेही दुसऱ्यांदा निवृत्ती घेत असल्याचे स्पष्ट केले आहे. हे दोन्ही खेळाडू यावर्षी झालेल्या टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत खेळले होते. दोघेही पाकिस्तानसाठी आयर्लंडविरुद्ध अखेरचा सामना खेळले आहेत. इमाद आणि अमीर दोघेही टी-२० विश्वचषकापूर्वीच निवृत्त झाले होते. मात्र, त्यांनी पाकिस्तान सुपर लीगमधील चांगल्या कामगिरीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमनाचा निर्णय घेतला होता. त्यांनी निवृत्ती मागे घेतल्याने त्यांना टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तान संघात संधी मिळाली होती. मात्र, आता दोघेही निवृत्त झाले आहेत.



**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)